RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
१२ रविवार एप्रिल २०२६
✼ वर्ष ५ ✼ अंक ३१६
✼ पृष्ठ : ६ ✼ मूल्य रु : ३

### इराण-अमेरिका युद्धविरामावर चर्चा

■ पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे इराण आणि अमेरिका यांच्यातील शस्त्रसंधी चर्चेची पहिली फेरी दोन तास चालली. प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, इराणने लेबनॉनवरील हल्ला तात्काळ थांबवण्याची मागणी केली आहे. या बैठकीत तज्ज्ञांनी सुरक्षा, राजकारण, लष्कर, अर्थव्यवस्था आणि कायदेशीर मुद्द्यांवर चर्चा केली. अमेरिकेच्या बाजूने उपराष्ट्रपती जेडी व्हान्स, तर इराणच्या बाजूने संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी नेतृत्व केले. ही बैठक उद्याही सुरू राहण्याची शक्यता आहे. १९७९ मध्ये झालेल्या इराणच्या इस्लामिक क्रांतीनंतर ४७ वर्षांनी, दोन्ही देशांच्या नेत्यांनी इतक्या मोठ्या प्रमाणावर समोरासमोर चर्चा करण्याची ही पहिलीच वेळ होती.

## आशा भोसले रुग्णालयात दाखल

▶विदर्भ केसरी। मुंबई :

ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांना शनिवारी प्रकृती अस्वास्थ्यामुळे दक्षिण मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. ९२ वर्षीय आशा भोसले यांच्यावर ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत, मात्र त्यांच्या प्रकृती अस्वस्थ्याचे नेमके कारण रात्री उशिरापर्यंत समजू शकले नाही. गेली आठ दशकांहून अधिक काळ भारतीय चित्रपट संगीतसृष्टीतील अलौकिक व्यक्तिमत्व म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आशा भोसले वयाची नव्वदी उलटल्यावरही त्याच उत्साहाने कार्यरत आहेत. २०२३ मध्ये दुबईत गाण्यांचा जाहीर कार्यक्रम करून त्यांनी आपला नव्वदावा वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा केला. नव्वदाव्या वर्षी देशभरात विविध ठिकाणी झालेल्या कार्यक्रमातून आपली गाणी सादर करत त्यांनी रसिकांची मने जिंकली.

## वृद्धाचा गव्याच्या धडकेत जागीच मृत्यू

▶विदर्भ केसरी। धामोड:

राधानगरी तालुक्यातील पाल खुर्द येथे राहीचे वावर नावाच्या शेतात गव्याने धडक दिल्याने वृद्ध जागीच ठार झाला. शामराव कोंडीबा कोराणे (वय ७०, रा. पाल खुर्द) असे मृताचे नाव आहे. ही घटना शनिवारी (दि.११) दुपारी दीडच्या सुमारास घडली. याबाबत अधिक माहिती अशी की, शामराव कोराणे यांच्या शेता शेजारीच गावाला पाणी पुरवठा करणारी पाण्याची टाकी आहे. ते आपल्या काजूच्या बागेच्या राखणीसाठी गेले होते. त्यावेळी बसलेल्या स्थितीतच गव्याने त्यांना जोराची धडक दिली. गव्याने शिंग मारल्याने यात त्यांच्या छातीला गंभीर दुखापत झाली आणि जागेवरच त्यांचा मृत्यू झाला.

# महात्मा फुलेंनी त्या काळी सामान्य माणसाला शेअर बाजारही शिकवला- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

▶विदर्भ केसरी।





महात्मा जोतिबा फुले हे केवळ क्रांतीकारक समाजसुधारक नव्हते, तर ते प्रगतशील शेतकरी, कुशल नगररचनाकार आणि यशस्वी उद्योजकही होते. सामान्य माणसाला आर्थिक साक्षरता मिळावी म्हणून त्यांनी त्या काळात शेअर बाजाराचे कार्य कसे चालते, हे गीते आणि कवितांच्या माध्यमातून मांडले होते, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महात्मा फुलेंच्या विविधांगी कार्याचा गौरव केला.

पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने खानापूर येथे आयोजित महात्मा जोतिबा फुले द्विशताब्दी जन्मोत्सव सोहळ्याच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी जिल्हा परिषदेच्या अत्याधुनिक 'ज्योती-सावित्री' सीबीएसई शाळेचे लोकार्पण केले आणि विविध महत्त्वाच्या घोषणा केल्या. या शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले की, येथील लहान मुलींचे प्रगल्भ विचार पाहून त्यांच्यात खऱ्या अर्थाने सावित्रीबाई फुलेंचा वारसा दिसून येतो. विशेषतः नासा आणि इस्रोला गेलेल्या मुली आणि फ्रेंच-जर्मन भाषा शिकणाऱ्या विद्यार्थिनींचे कौतुक वाटते.

मुख्यमंत्र्यांनी महात्मा फुलेंच्या उद्योजकतेचा एक दुर्मीळ दाखला दिला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई महानगरपालिकेच्या इमारतीचे बांधकाम करणाऱ्यांपैकी महात्मा फुले हे एक प्रमुख कंत्राटदार होते. ब्रिटिशांनी त्या कामासाठी जेवढा खर्च मंजूर केला होता, त्यापेक्षा 15 टक्के कमी खर्चात फुलेंनी ते काम पूर्ण करून दाखवले. आजही मुंबई पालिकेत या प्रामाणिकपणाचा बोर्ड पाहायला मिळतो. केवळ पालिकाच नव्हे, तर कात्रजचा बोगदा, येरवडा कारागृह आणि रेल्वे वर्कशॉपच्या बांधकामातही त्यांच्या 'ऑन्टरप्रिनर स्पिरिट'चे दर्शन घडते.

### हीच खरी मानवंदना

■ देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महात्मा फुले यांच्या नावाने राज्यात 1,000 नवीन कौशल्य प्रशिक्षण केंद्रे उभारली जाणार आहेत. पुणे जिल्हा परिषदेने 'इंडस्ट्री 4.0' च्या धर्तीवर 100 शाळांमध्ये अत्याधुनिक लॅब्स सुरू केल्याबद्दल त्यांनी कौतुक केले.महिलांना लोकसभा आणि विधानसभेत 33 टक्के आरक्षण देणे, हीच महात्मा फुलेंच्या विचारांना खरी मानवंदना असल्याचे त्यांनी नमूद केले

### एक चांगले नगररचनाकार

■ देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढा दिलाच, पण त्यासोबत शेतीमध्ये नवीन प्रजाती आणि फळबागांचे तंत्र विकसित करण्याचे मॉडेलही मांडले. शहराचे नियोजन कसे असावे, याबद्दल त्यांचे विचार प्रगत होते. पुणे नगरपालिकेचे कमिशनर म्हणून 7 वर्षे काम करताना त्यांनी शहराच्या रचनेत मानवी दृष्टिकोन जपला होता.

# सरकारचे विद्यार्थी सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य

## शालेय वाहतूक अधिक सुरक्षित, पारदर्शक, उत्तरदायी करण्यास सरकार कटिबद्ध - सरनाईक

▶विदर्भ केसरी।



राज्य सरकारने शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत शालेय बस व वाहतूक व्यवस्थेविषयी कडक व सर्वसमावेशक नियमावली जाहीर करण्याची तयारी सुरू केली आहे. राज्याच्या गृह विभागाने याविषयीची मसुदा अधिसूचना जारी केली आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी याविषयी जनतेला सकारात्मक प्रतिसाद देण्याचे आवाहन केले आहे.

राज्याच्या गृह विभागाने प्रसिद्ध केलेल्या मसुदा अधिसूचनेनुसार, महाराष्ट्र मोटार वाहन (शालेय बस नियमन) (प्रथम सुधारणा) नियम, 2026 लागू करण्याचा प्रस्ताव आहे. त्यात सुरक्षितता, पारदर्शकता व जबाबदारी यावर विशेष भर देण्यात आला आहे. सरकारने ही अधिसूचना जारी झालेल्या तारखेपासून 15 दिवसांच्या विहित वेळात संबंधित संकेतस्थळावर सर्वसामान्य जनतेकडून हरकती व सूचना मागवल्या आहेत. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी याविषयी जनतेला सकारातात्मक प्रतिसाद देण्याचे आवाहन केले आहे.

■ **नव्या नियमांद्वारे मिळणार पालकांना दिलासा**

सरकारच्या नव्या नियमानुसार, शालेय बसचे भाडे आता प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून निश्चित केले जाईल. विद्यार्थ्यांकडून केवळ मासिक भाडेच आकारले जाईल. या प्रकरणी एकरकमी आगाऊ रक्कम घेण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे पालक वर्गाला मोठा आर्थिक दिलासा मिळेल. या प्रकरणी प्रत्येक शाळेत स्कूल ट्रान्सपोर्ट कमिटी कार्यरत राहील. ही समिती भाडे, सुरक्षितता व सेवा यासंबंधी पालकांच्या तक्रारींचे निवारण करेल. या समितीला तिमाही अहवाल सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

सर्व शालेय बस व व्हॅनमध्ये जीपीएस - आधारित Vehicle Location Tracking Device (VLTD) व पॅनिक बटण बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय अग्निसुरक्षा यंत्रणा (FDAS), CCTV प्रणाली व सर्व सीट्ससाठी सीट बेल्टची सक्तीही करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक वाहनात डीजिटल सेफ्टी मॉनिटरिंग सिस्टम बसवणे आवश्यक असेल. या प्रणालीद्वारे वाहनाचे लाईव्ह ट्रॅकिंग, डिजिटल उपस्थिती नोंद, स्वयंचलित अलर्ट आणि पालकांना थेट माहिती मिळणार आहे. राज्यस्तरीय प्लॅटफॉर्मशी या प्रणालीचे एकत्रीकरणही करण्यात येणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याची चढ-उतार वेळेसह दैनिक उपस्थिती नोंदवणे बंधनकारक असेल. विशेषतः पूर्व-प्राथमिक आणि प्राथमिक (इयत्ता 5 वीपर्यंत) विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक प्रवासात महिला परिचारिका किंवा नियुक्त कर्मचारी असणे आवश्यक राहील. विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षित कर्मचारी, सुलभ प्रवेश व्यवस्था आणि आवश्यक तेव्हा पालक/शिक्षक उपस्थितीची तरतूद करण्यात आली आहे. बस चालक, वाहक व इतर कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणी, वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र आणि अधिकृत नियुक्तीपत्र अनिवार्य करण्यात आले आहे. सर्व नोंदी तपासणीसाठी उपलब्ध ठेवणे बंधनकारक असेल.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
!! पाहिजेत !!
**कार्यालय व्यवस्थापक** (Office Manager)
'दैनिक विदर्भ केसरी'च्या दर्यापूर येथील कार्यालयासाठी एक सक्षम, अनुभवी आणि तरुण कार्यालय व्यवस्थापक पाहिजे आहे.
पात्रता आणि आवश्यकता:
पत्रकारिता क्षेत्रातील ज्ञान तसेंच राजकीय पत्रकारिता आणि वृत्तपत्र कार्यालयाच्या कामाचा किमान २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
**उत्तम जनसंपर्क:** स्थानिक राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात चांगला जनसंपर्क असणे महत्त्वाचे.
**संगणक ज्ञान:** आणि इंटरनेटचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक स्वतःची दुचाकी असणे अनिवार्य आहे.
■ शिक्षण: कोणत्याही शाखेचा पदवीधर
■ आकर्षक मानधन: पात्र उमेदवाराला योग्य आणि आकर्षक मानधन दिले जाईल.
■ एक प्रतिष्ठित आणि वेगाने वाढणाऱ्या माध्यम समूहात काम करण्याची संधी.
इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा:
कार्यालय: आयेशा टॉवर, दर्यापूर, जि. अमरावती.
संपर्क: ९९७५५३२२९१/९०९६९४५६२९

## मराठवाडा हादरला! हिंगोलीत 4.7 रिश्टरचा भूकंप




▶विदर्भ केसरी।

मराठवाडा परिसरात पुन्हा एकदा भूकंपाचे धक्के जाणवले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आज सकाळी 8 वाजून 47 मिनिटांनी हिंगोली जिल्ह्यात भूकंप झाला. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर 4.7 इतकी नोंदवली गेली आहे. अचानक बसलेल्या या धक्क्यामुळे नागरिक काही काळ घराबाहेर पडल्याचे चित्र पाहायला मिळाले.

भूकंप हिंगोली जिल्ह्यातील औंढानागनाथ परिसरात झाल्याची माहिती सर्वप्रथम समोर आली. मात्र, वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे गावाजवळ भूकंपाचे मुख्य केंद्र असल्याचे प्राथमिक निष्कर्षातून स्पष्ट झाले आहे. या भागात काही सेकंद जमीन हलल्याची जाणीव नागरिकांना झाली. या भूकंपाची नोंद लातूर येथील भूकंप मापन केंद्रावर करण्यात आली आहे. मराठवाड्यातील भूकंपीय हालचालींवर लक्ष ठेवणाऱ्या यंत्रणांनी तात्काळ या घटनेची माहिती संकलित केली. अधिकृत आकडेवारीनुसार, भूकंपाची तीव्रता मध्यम स्वरूपाची असली तरी काही ठिकाणी कंप स्पष्टपणे जाणवले. हिंगोलीसह नांदेड आणि परभणी जिल्ह्यांमध्येही या भूकंपाचे धक्के जाणवले. अनेक नागरिकांनी घरातील वस्तू हलल्याचे सांगितले. काही ठिकाणी लोक घाबरून घराबाहेर धावले, मात्र सुदैवाने आतापर्यंत कोणतीही मोठी जीवित किंवा वित्तहानी झाल्याची माहिती नाही.

■ **प्रशासनाने नागरिकांना घाबरू नये, शांत राहावे आणि कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास त्वरित प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे. स्थानिक प्रशासन आणि आपत्कालीन यंत्रणा सतर्क ठेवण्यात आल्या असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. दरम्यान, मराठवाडा हा भूकंपप्रवण पट्टा मानला जात असल्याने अशा घटनांची पुनरावृत्ती होत असते. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहून सुरक्षिततेच्या उपाययोजना पाळाव्यात, असे आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात आले आहे.**



अग्रलेख

# भविष्याचे मार्गदर्शक

भारताचे महान समाजसुधारक एक आणि पिढ्यान् पिढ्यांचे दीपस्तंभ महात्मा जोतिराव फुले यांची जयंती. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या उत्सवाचा प्रारंभ आजपासून होत आहे. त्यानिमित्त... महात्मा फुले हे एक महान समाजसुधारक होते. त्याबरोबरच त्यांचे जीवन नैतिक धैर्य, निरंतर जिज्ञासा आणि सामाजिक हितासाठी अविचल वचनबद्धतेचे प्रतीक होते. महात्मा फुले यांनी उभारलेल्या संस्था आणि त्यांनी नेतृत्व केलेल्या चळवळींसाठी त्यांचे स्मरण केले जाते. 1827 मध्ये महाराष्ट्रात जन्मलेल्या महात्मा फुले यांची अत्यंत सामान्य परिस्थितीतून सुरुवातीची वाटचाल सुरू झाली; परंतु सुरुवातीच्या काळात आलेल्या या अडचणी त्यांचे शिक्षण, धैर्य किंवा समाजाप्रति असलेल्या बांधिलकीच्या आड कधीही आल्या नाहीत. शालेय जीवनापासूनच तरुण जोतिराव अत्यंत जिज्ञासू होते आणि त्यांच्यात वाचनाची प्रचंड आवड निर्माण झाली होती. अनेकदा ते त्यांच्या वयातील मुलांकडून अपेक्षित असलेल्या पुस्तकांपेक्षा कितीतरी पटीने अधिक पुस्तकांचे वाचन करत असत. अनेक वर्षांनंतर याविषयी बोलताना ते म्हणाले होते, 'आपण जितके जास्त प्रश्न निर्माण करू, तितके ज्ञान त्यातून बाहेर येईल.' त्यांच्या बालपणापासून त्यांना लाभलेली चौकस वृत्ती त्यांच्या वाटचालीत सदैव स्थिर राहिली. महात्मा फुले यांच्या आयुष्याचे ध्येय हे शिकणे आणि शिक्षण देणे हेच बनले होते. शिक्षण आणि ज्ञान, ही कोणा एकाची मक्तेदारी असू शकत नाही, ती एक शक्ती आहे, जी सगळ्यांपर्यंत पोहोचलीच पाहिजे, याची अत्यंत दुर्मीळ अशी स्पष्टता त्यांना आली होती. जेव्हा शिक्षणाचा आनंद अनेकांना नाकारला जात होता, अशा काळात त्यांनी मुलींसाठी आणि ज्यांना औपचारिक शिक्षणापासून वंचित ठेवले गेले होते, अशा सर्वांसाठी पहिल्यांदा शाळा सुरू केल्या. ते म्हणत, 'मुलांमध्ये आईच्या मार्फत होणारी कोणतीही सुधारणा अत्यंत महत्त्वाची असते आणि म्हणूनच जर शाळा सुरू करायच्या असतील, तर त्या मुलींसाठी काढल्या पाहिजेत.' त्यांनी अशा एका समाजाच्या निर्मितीसाठी काम केले, जिथे शाळा या न्याय आणि समता प्रस्थापित करण्याचे माध्यम बनल्या. महात्मा फुले यांचे ज्ञान आणि शहाणीव यातून त्यांची कृषी, आरोग्य आणि ग्रामविकासाविषयीची समज विकसित झाली होती. आपले शेतकरी आणि कामगार यांच्यावर होणारा अन्याय आपल्या समाजाला दुर्बल करतो आहे, असे ते नेहमी म्हणत असत. गावात असो किंवा मग शेतात, या घटकांना सामाजिक विषमतेचे चटके कसे सहन करावे लागत आहेत, ते त्यांनी पाहिले होते आणि म्हणूनच त्यांनी गरीब, वंचित आणि दुर्बल घटकांना त्यांचा आत्मसन्मान त्यांची प्रतिष्ठा मिळवून देण्याच्या कार्यात स्वतःला वाहून घेतले. त्याच वेळी सामाजिक सौहार्दसुद्धा कायम राहील यासाठीदेखील त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. महात्मा फुले म्हणाले होते की, जोपर्यंत समाजातील सर्वांना समान अधिकार मिळत नाहीत, तोपर्यंत खरे स्वातंत्र्य मिळत नाही. म्हणूनच तर त्यांनी हा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरणाऱ्या संस्था उभ्या केल्या आणि या संस्थांनी एका न्याय्य समाजाच्या निर्मितीत मोठे योगदान दिले. त्यांनी स्थापित केलेला सत्यशोधक समाज ही चळवळ आधुनिक भारतातील सर्वात महत्त्वाच्या सामाजिक सुधारणा चळवळींपैकी एक होती. सामाजिक सुधारणा, समाजसेवा आणि प्रत्येक माणसाच्या सन्मानाला प्रतिष्ठा मिळवून देण्यात ही चळवळ आघाडीवर होती. ही चळवळ समाजातील महिला, युवा आणि ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांची एक ठोस प्रभावशाली अभिव्यक्ती बनली. समाजाने आपल्या गाभ्याशी न्याय, प्रत्येक व्यक्तीबद्दलचा आदर आणि सामूहिक प्रगतीची भावना ही मूल्ये जपली, तर तो समाज अधिक सक्षम होऊ शकतो असा महात्मा फुले यांचा ठाम विश्वास होता. या चळवळीतूनही महात्मा फुले यांच्या याच विश्वासाचे प्रतिबिंब उमटले होते. महात्मा फुले यांच्या वैयक्तिक जीवनातूनही आपल्याला धैर्याची शिकवण मिळते. सतत कामात गुंतून राहिलेले असणे, सातत्याने लोकांमध्ये असणे याचा त्यांच्या प्रकृतीवर विपरीत परिणामही झाला; मात्र प्रकृतीबात अत्यंत गंभीर आव्हाने समोर असतानाही त्यांचा निर्धार तसूभरही ढळला नाही. अर्धांगवायूच्या गंभीर झटक्याने त्यांना असंख्य मर्यादा आल्या; पण तरीही त्यांनी आपले काम आणि संकल्प साकारण्याचे प्रयत्न सुरूच ठेवले. त्यांचे शरीर जणू त्यांची सत्त्वपरीक्षाच घेत होते; मात्र समाजाप्रती असलेल्या वचनबद्धतेपासून त्यांनी कधीही फारकत घेतली नाही. त्यामुळेच आजही लाखो लोकांसाठी महात्मा फुले यांचा हा पैलू सर्वात शक्तिशाली पैलूंपैकी एक आहे. सावित्रीबाई फुले यांचा आदरपूर्वक उल्लेख केल्याशिवाय महात्मा फुले यांचे स्मरण पूर्ण होऊच शकत नाही. त्या स्वतः देशातील महान सुधारकांपैकी एक होत्या. भारतातील स्त्री शिक्षणाचा भक्कम पाया रचणाऱ्या आघाडीच्या महिला शिक्षिकांपैकी त्या एक होत्या. त्यांनी मुलींच्या शिक्षणाला पुढे नेण्यात निर्णायक भूमिका बजावली होती आणि आपली स्वप्ने पूर्ण करण्याची संधी मुलींना मिळवून दिली होती. महात्मा फुले यांचे निधन झाल्यानंतरही सावित्रीबाईंनी हा वसा तसाच पुढे चालू ठेवला. 1897 मध्ये प्लेगच्या साथ रोगाचा उद्रेक झालेला असताना त्यांनी बाधित रुग्णांची समर्पण भावनेने सेवा केली. त्या स्वतः त्या रोगाच्या विळख्यात सापडल्या आणि त्यातच त्यांना प्राण गमावावे लागले. देशात शेकडो वर्षांपासून समाज सुधारणेची कळकळीची हाक समाजातून उमटली आहे, ती अशा लोकांकडून ज्यांना समाजातील दुःख स्पष्टपणे दिसत होते आणि नशिबाचा भाग म्हणून तो स्वीकारायला त्यांनी ठामपणे नकार दिला. महात्मा जोतिराव फुले हे अशाच एका बुलंद आवाजाचे प्रतीक होते.मला 2022 मधील माझ्या पुणे भेटीचे स्मरण होते. त्यावेळी मी शहरातील फुले यांच्या भव्य पुतळ्याला अभिवादन केले होते. आपण त्यांच्या द्विशताब्दी वर्षात पाऊल ठेवत आहोत. अशावेळी या सगळ्याचे पुनर्नविनीकरण अर्थात नवी मांडणी करणे हीच महात्मा फुले यांना वाहिलेली यथार्थ आदरांजली ठरेल. त्यांना अत्यंत प्रिय असलेल्या शिक्षणासारख्या विषयांप्रती आपल्या बांधिलकीची नव्याने मांडणी करत आहोत, अन्यायाप्रती आपल्या संवेदनशीलतेची पुन्हा नव्याने जाणीव करून देत आहोत आणि समाजात स्वबळावर स्वतःत सुधारणा घडवून आणण्याची क्षमता आहे, हा विश्वास नव्याने जागृत करत आहोत. नैतिक स्पष्टता आणि लोककल्याणाचा उद्देश यांची जोड मिळाल्यास भारतातील सामुदायिक शक्ती चमत्कार घडवून आणू शकते, असेच त्यांची जीवनगाथा आपल्याला सांगते आणि म्हणूनच ते आजही लाखोंना प्रेरणा देत आहेत. त्यांचे शब्द आणि कृती यांच्यातून आजही आशेचा किरण डोकावतो आणि म्हणूनच महात्मा जोतिराव फुले हे त्यांच्या जन्मापासून दोनशे वर्षांनंतरही केवळ भूतकाळातील एक व्यक्तिमत्त्व नव्हे, तर भारताच्या भविष्याचे मार्गदर्शक आहेत.





यवतमाळ : महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमातून समग्र क्रांतीचे जनक महात्मा ज्योतिबा फुले यांना शनिवारी (ता.११) अभिवादन करण्यात आले. आझाद मैदान परिसरातील महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्यास अनेक नागरिकांनी माल्यार्पण करीत आदरांजली वाहिली. यात पालकमंत्री संजय राठोड, खासदार संजय देशमुख, आ. बाळासाहेब मांगुळकर, माजी मंत्री शिवाजीराव मोघे व प्रा. वसंतराव पुरके यांनीही अभिवादन केले. दरम्यान्य द्विशताब्दी वर्षानिमित्त वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा यासह विविध कार्यक्रम घेण्यात आले.यावेळी सुनयना संजय येववतकर,प्रा. बबलू देशमुख, नगरसेवक संतोष बोरेले यांच्यासह अन्य मान्यवर.

## हिंगोली जिल्ह्यात रिश्टर स्केलवर ४.७ तीव्रतेचा भूकंप

### पूसद, वसंतनगरमध्ये सौम्य धक्के

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

आज हिंगोली जिल्ह्यात रिश्टर स्केलवर ४.७ तीव्रतेचा भूकंप नोंदविण्यात आला. या भूकंपाचे सौम्य धक्के यवतमाळ जिल्ह्यातील पुसद, वसंतनगर तसेच आसपासच्या परिसरात जाणवले आहेत.



प्राथमिक माहितीनुसार, या भूकंपामुळे यवतमाळ जिल्ह्यात कोणतीही जीवित किंवा मालमत्तेची हानी झालेली नाही. संबंधित यंत्रणांकडून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवण्यात येत असून नागरिकांनी घाबरून न जाता शांतता राखावी, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात येत आहे. आपत्ती व्यवस्थापन विभाग, महसूल प्रशासन व स्थानिक यंत्रणा सतर्क असून कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी सज्ज आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये व अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा. भूकंपाचे धक्के जाणवल्यास सुरक्षित ठिकाणी जावे, इमारतीबाहेर मोकळ्या जागेत उभे राहावे व आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे प्रशासनाव्दारे सूचित करण्यात येत आहे

## रानडुकराची शिकार करून मांस विक्री करणारी टोळी गजाआड

**▸विदर्भ केसरी। भंडारा :**

तुमसर तालुक्यातील नाकाडोंगरी वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या नाकाडोंगरी बीट क्रमांक २ मध्ये रानडुकराची शिकार करून मांस विक्री करणाऱ्या टोळीला जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी रानडुकराचे मांस जप्त केले असून तिन्ही आरोपींविरुद्ध वन कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

बुधवारी (दि.८) रोजी दुपारी १२.३० च्या सुमारास नाकाडोंगरी वनपरिक्षेत्र अधिका०यांना खात्रीलायक माहिती मिळाली की, नाकाडोंगरी बीटमधील खाजगी प्लॉट क्रमांक ३३९ मध्ये एका रानडुकराची शिकार करून त्याच्या मांसाची विल्हेवाट लावण्याची तयारी सुरू आहे. या माहितीच्या आधारे वनविभागाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाड टाकली. त्यावेळी तिथे सुमारे दोन वर्ष वयाचा एक नर रानडुक्कर मृतावस्थेत आढळला आणि आरोपी त्याचे मांस कापण्याच्या तयारीत होते. छाप्यादरम्यान हर्षद किशोर राऊत (२८, रा. सीतासावंगी) याला पथकाने रंगेहात पकडले, मात्र इतर दोन आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाले होते. वनविभागाच्या पथकाने तातडीने शोधमोहीम राबवून फरार झालेल्या अजय मयपत मेश्राम (२७, रा. सीतासावंगी) आणि जितेंद्र रुधा तांडेकर (३०, रा. कवलेवाडा) यांनाही सीतासावंगी परिसरातून अटक केली. पशुवैद्यकीय अधिका०यांच्या उपस्थितीत मृत रानडुकराचे शवविच्छेदन करण्यात आले असून, तपासासाठी नमुने प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत.

## वृद्धाची वाघाकडून शिकार

### ३० दिवसांनंतर जंगलात आढळला सांगाडा आरमोरी तालुक्यात खळबळ..

**▸विदर्भ केसरी। गडचिरोली :**

जंगलात हरवलेले बैल शोधण्यासाठी गेलेल्या एका ७७ वर्षीय वृद्धाचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. धर्माजी पांडुरंग कस्तुरे (रा. मौशीखांब) असे मृताचे नाव असून, बेपत्ता झाल्याच्या ३० दिवसांनंतर गुरुवारी त्यांचा सांगाडा मौशी चक जंगल परिसरात आढळून आला. या घटनेमुळे परिसरात वाघाची दहशत निर्माण झाली असून वनविभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

धर्माजी कस्तुरे हे २ फेब्रुवारी रोजी आपल्या शेतातील बैल हरवल्याने त्यांचा शोध घेण्यासाठी जंगलात गेले होते. मात्र, अंधार पडल्यानंतरही ते घरी परतले नाहीत. नातेवाईकांनी गावकरी आणि आप्तेष्टांकडे विचारपूस केली, सर्वत्र शोध घेतला, परंतु त्यांचा काहीही पत्ता लागला नाही. अखेर आरमोरी पोलीस ठाण्यात ते बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवण्यात आली होती.

११ एप्रिल रोजी मौशी चक परिसरातील जंगलात, गावापासून साधारण तीन किलोमीटर अंतरावर काही अवशेष विखुरलेले असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले. माहिती मिळताच गडचिरोली पोलिसांनी घटनास्थळ गाठले. तेथे एक मानवी सांगाडा, फाटलेले कपडे, बैल बांधण्याची दोरी आणि कमरेचा करदोडा आढळून आला. या वस्तूंच्या आधारे कस्तुरे यांच्या मुलाने आणि नातेवाईकांनी हा सांगाडा धर्माजी कस्तुरे यांचाच असल्याची पुष्टी केली ज्या भागात हा सांगाडा सापडला, तिथे वाघ आणि बिबट्यांचा मोठा वावर असल्याचे वनविभागाकडून सांगण्यात येते. वाघाने कस्तुरे यांच्यावर हल्ला करून त्यांना फरफटत नेले असावे आणि त्यानंतर मृतदेहाचा काही भाग फस्त केला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे.

## पिकअपने पेट घेतला ; चौघांचा होरपळून मृत्यू

**▸विदर्भ केसरी।नाशिक : प्रतिनिधी**

सिन्नरमध्ये भीषण अपघातामध्ये चौघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. भरधाव ट्रकने पिकअपला जोरदार धडक दिली. अपघातानंतर पिकअपने पेट घेतला. या आगीमध्ये होरपळून चौघांचा मृत्यू झाला. तर दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. जागरण गोंधळाच्या कार्यक्रमावरून परत येत असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला. शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, सिन्नर तालुक्यात पंचाळेजवळ हा भीषण अपघात झाला. ट्रक आणि पिकअपची समोरासमोर धडक झाली. हा अपघात इतका भीषण होता की अपघातानंतर पिकअपने पेट घेतला.

या अपघातामध्ये बाहेर फेकल्या गेलेल्या एका महिलेचा जागीच मृत्यू झाला. तर तिघांना पिकअपमधून बाहेर पडता न आल्याने त्यांचा होरपळून मृत्यू झाला. मध्यरात्री या अपघाताची माहिती मिळताच सिन्नरच्या रुग्णवाहिका, सिन्नर नगरपालिकेचे अग्निशमन दल, एमआयडीसीचे अग्निशमन दल आणि एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मध्यरात्री मदतकार्य केले. या अपघातामध्ये जखमी झालेल्या दोघांना उपचारासाठी सिन्नर येथील उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. अपघातामध्ये मृत्यू झालेले चौघे जण सिन्नर तालुक्यातील पंचाळे गावातील रहिवासी होते. मृतांवर शोकाकुल वातावरणात अन्त्यसंस्कार करण्यात आले. मृतांमध्ये पती-पत्नीचा समावेश आहे. पिकअप चालक किरण रवींद्र मोरे (२५ वर्षे), शुभम गणेश नवले (२२ वर्षे), रिंकू शुभम नवले (१९ वर्षे), मीराबाई विश्वनाथ गांगुर्डे (३५ वर्षे) अशी मृतांची नावं समोर आली आहेत. सचिन गणेश नवले, सुनीता गणेश नवले हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत.

## वृद्धाचा गव्याच्या धडकेत जागीच मृत्यू

**▸विदर्भ केसरी। धामोड:**

राधानगरी तालुक्यातील पाल खुर्द येथे राहीचे वावर नावाच्या शेतात गव्याने धडक दिल्याने वृद्ध जागीच ठार झाला. शामराव कोंडीबा कोराणे (वय ७०, रा. पाल खुर्द) असे मृताचे नाव आहे. ही घटना शनिवारी (दि.११) दुपारी दीडच्या सुमारास घडली. याबाबत अधिक माहिती अशी की, शामराव कोराणे यांच्या शेता शेजारीच गावाला पाणी पुरवठा करणारी पाण्याची टाकी आहे. ते आपल्या काजूच्या बागेच्या राखणीसाठी गेले होते. त्यावेळी बसलेल्या स्थितीतच गव्याने त्यांना जोराची धडक दिली.




दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीश: संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## महत्त्वाचे



### आर्णी येथे निम्न पैनगंगा धरणाविरोधात भव्य चक्का जाम आंदोलन संपन्न

**▸विदर्भ केसरी। आर्णी**

आर्णी येथे निम्न पैनगंगा धरण प्रकल्प रद्द करण्याच्या मागणीसाठी राष्ट्रीय किसान मोर्चाच्या वतीने १० एप्रिल रोजी तुळजापूर-नागपूर राष्ट्रीय महामार्ग ३६१ वर आयोजित करण्यात आलेले भव्य रास्ता रोको (चक्का जाम) आंदोलन मोठ्या उत्साहात व शांततेत संपन्न झाले. या आंदोलनात धरणग्रस्त गावांतील शेतकरी, शेतमजूर, महिला व युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. निम्न पैनगंगा धरण प्रकल्पामुळे सुमारे ९५ गावे बाधित होणार असून जवळपास ५० हजार एकर सुपीक शेती पाण्याखाली जाणार आहे. तसेच सुमारे दीड लाख नागरिकांचे भविष्य धोक्यात येणार असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. याशिवाय या प्रकल्पासाठी आवश्यक असलेले SIA रिपोर्ट, DPR अहवाल तसेच LARR Act 2013 नुसार पुनर्वसन आणि योग्य मोबदल्याची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही, असेही आंदोलनकर्त्यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर आर्णी येथे सकाळी मोठ्या संख्येने शेतकरी जमा झाले आणि तुळजापूर-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर चक्का जाम आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. आंदोलनादरम्यान "गाव वाचवा - शेती वाचवा - भविष्य वाचवा" या घोषणांनी परिसर दणाणून गेला. या आंदोलनात दिपक इंगळे पाटील (प्रदेश अध्यक्ष, राष्ट्रीय किसान मोर्चा), बालाजी कांबळे (प्रदेश प्रभारी), दिपक देवसरकर (कार्याध्यक्ष) यांच्यासह बिमोद मुधाणे, भुवन मुनेश्वर, सुनील गवई, प्रशांत मुनेश्वर, विद्वान केवटे, गजानन गोडवे, सम्यक मुनेश्वर, सतीश मुनेश्वर आदी कार्यकर्ते उपस्थित होते .दरम्यान, शासनाने तात्काळ निम्न पैनगंगा धरण प्रकल्प रद्द करावा, अन्यथा पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांच्या वतीने देण्यात आला.

### कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल

**▸विदर्भ केसरी। आर्णी :**

निम्न पैनगंगा धरण रद्द करा या मागणीसाठी राष्ट्रीय किसान मोर्चाच्या वतीने १० एप्रिल रोजी आर्णी येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आता या आंदोलक कार्यकर्त्यांवर आर्णी पोलीसांनी विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत. शुक्रवारी आर्णी तहसील कार्यालयाबाहेर मंडप टाकून चार तास निदर्शने करण्यात आली.त्यानंतर सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास राष्ट्रीय महामार्गावर दतरामपूर येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. राष्ट्रीय महामार्गाने जाणाऱ्या रहदारीस व वाहतुकीस अडथळा निर्माण केला. पोलिसांनी आंदोलकांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला तर आंदोलक आपल्या मागणीवर ठाम होते. शेवटी पोलीसांनी बळाचा वापर करून सर्व आंदोलकांना आर्णी पोलिस ठाण्यात आणले. नंतर आंदोलक कार्यकर्त्यावर पोलिस कान्सटेबल रवी चव्हाण यांच्या तक्रारीवरून गुन्हे दाखल करण्यात आले. यात राष्ट्रीय किसान मोर्चाचे गजानन निवृत्ती गोडवे, भुवन गौतम मुनेश्वर, बालाजी केशवराम कांबळे, प्रशांत विजय मुनेश्वर, देवराव शिवाजी पाईकराव, बीमोद विठ्ठल मुदाने, विक्रम गोविंदराव कांबळे, चक्रधर पांडुरंग देवसरकर, प्रमोद जाधव पाटील, विलास वसंत भोयर, सम्यक बुद्धशोक मुनेश्वर, शुभम तुकाराम खंदारे, सुनील दत्तू राम गवई, दीपक राजाभाऊ इंगळे, दादाराव हिरामणजी भाजीखावे व इतर १० ते १५ लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

# "गावातच मिळणार सरकारी सेवा!"

## कुही तहसीलचा धडाकेबाज उपक्रम; मांढळ येथे महसूल शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**▸विदर्भ केसरी। राजहंस शेंडे**




कुही (जि. नागपूर) : "सरकारी कामासाठी आता तहसील कार्यालयाच्या फेऱ्या नाहीत!" — कुही तहसील प्रशासनाने सुरू केलेल्या महसूल शिबिर अभियानामुळे ही घोषणा आता प्रत्यक्षात उतरू लागली आहे. 'प्रशासन आपल्या दारी' या संकल्पनेला मूर्त रूप देत गावागावात थेट महसूल शिबिरे भरवून 'वन डे सर्विस डिलिव्हरी'द्वारे नागरिकांना एका दिवसात सेवा देण्याचा प्रभावी उपक्रम राबविण्यात येत आहे.

या अभियानाअंतर्गत १० एप्रिल रोजी मांढळ येथे आयोजित महसूल शिबिराला नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळपासूनच नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. कुही तालुक्यातील विविध गावांमधून आलेल्या नागरिकांनी सातबारा दुरुस्ती, वारस नोंद, फेरफार, प्रलंबित प्रकरणे यांसंदर्भात अर्ज सादर केले. प्रशासनाने तक्रारी ऐकून अनेक प्रकरणांचा जागेवरच निपटारा करत नागरिकांना मोठा दिलासा दिला.

या शिबिरांमध्ये सातबारा (7/12) उताऱ्यातील दुरुस्ती, नोंदी अद्ययावत करणे, वारस नोंद, फेरफार, जमीन मोजणीसंबंधित सेवा तसेच विविध प्रकारची प्रमाणपत्रे देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून जलद, पारदर्शक आणि कार्यक्षम सेवा देण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. तहसील कुही अंतर्गत सिल्ली, वेलतूर, पचखेडी, मांढळ, राजोला, तितूर आणि कुही या ठिकाणी टप्प्याटप्प्याने शिबिरे आयोजित करण्यात आली असून, या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना थेट गावातच सेवा मिळत आहे. त्यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रमांची मोठ्या प्रमाणात बचत होत असून, प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी नायब तहसीलदार बुद्धभूषण निकाळजे, तलाठी मोहन पवार तसेच कृषी अधिकारी राजेश जारोंडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कुही तहसीलच्या या लोकाभिमुख उपक्रमामुळे ग्रामीण भागात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांकडूनही या निर्णयाचे मोठ्या प्रमाणावर स्वागत होत आहे. आता खऱ्या अर्थाने "एकाच दिवसात, आपल्या गावात" सरकारी सेवा उपलब्ध होत असल्याने प्रशासनाविषयीचा विश्वास अधिक दृढ होत आहे.

### महिलेचा विनयभंग


**▸विदर्भ केसरी। उमरखेड :**

रात्रीदरम्यान अचानक घरात घुसून एका महिलेचा चक्क पती व सासऱ्यापुढेच विनयभंग करण्यात आला. घरात घुसलेल्या या दोन आरोपींनी यावेळी पीडितेच्या पतीला आणि सासऱ्याला मारहाणही केली. ही गंभीर घटना १० एप्रिलच्या रात्री ११.३० वाजताच्या सुमारास घडली. पोलिसांनी दोन आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केले आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेच्या रात्री फिर्यादी महिला आपल्या पती व सासऱ्यासह घरात होती. त्यावेळी अचानक दरवाजावर जोरात आवाज झाला. दरवाजा उघडताच आरोपी गजानन अशोक डहाळे (२४) व अथर्व विजय माळवे (२४) दोन्ही रा, उमरखेड हे जबरदस्तीने घरात घुसले. यावेळी आरोपी अथर्व माळवे याने फिर्यादीचा हात धरून तिला जवळ ओढत तिचा विनयभंग केला. महिलेला त्याच्या तावडीतून सोडवण्यासाठी तिचे पती व सासरे पुढे आले असता, दोन्ही आरोपींनी त्यांना धक्काबुक्की करून मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणात पीडितेने उमरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यावरुन पोलिसांनी दोघांवर गुन्हा नोंद केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार प्रकाश बोंबले करीत आहे.

# 'रिसोड'च्या विकासासाठी बावनकुळेंचा 'शब्द'

## अतिक्रमणे नियमित होणार, निधीचीही मिळणार रसद!

**▸विदर्भ केसरी। रिसोड प्रतिनिधी**



> ■ रिसोडच्या जनतेची आणि विशेषतःघरकुल लाभार्थ्यांची निराशा होणार नाही. शहराच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी मंत्रालय स्तरावरून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल."
> -चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री

निवडणुकीत दिलेला शब्द आणि शहराच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेऊन रिसोडच्या लोकप्रतिनिधींनी नागपूर गाठले.राज्याचे महसूल मंत्री तथा भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन रिसोड शहरातील प्रलंबित प्रश्न निकाली काढण्याची मागणी केली.यावर महसूल मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, "रिसोडच्या विकासासाठी शासन आणि प्रशासन खंबीरपणे पाठीशी असून निधीची कमतरता भासू देणार नाही," अशी ग्वाही दिली.

रिसोड नगर परिषद निवडणुकीच्या दरम्यान महसूल मंत्री बावनकुळे यांनी अतिक्रमित जागेत राहणाऱ्या घरकुलार्थ्यांचे अतिक्रमण नियमानुकूल करण्याचे आश्वासन दिले होते.या आश्वासनाची पूर्तता व्हावी, यासाठी शिष्टमंडळाने आग्रही मागणी केली. घरकुल लाभार्थ्यांचे प्रस्ताव तात्काळ निकाली काढण्यासाठी स्थानिक यंत्रणेला निर्देश द्यावेत,जेणेकरून गोरगरिबांच्या हक्काच्या घरांचा प्रश्न सुटेल,याकडे मंत्र्यांचे लक्ष वेधण्यात आले.केवळ अतिक्रमणच नव्हे,तर शहराच्या आधुनिकते साठीही यावेळी चर्चा झाली.नगर परिषदेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सौरऊर्जा युनिट उभारणीसाठी महसूल विभागाची जागा उपलब्ध करून देणे,शहरातील पायाभूत सुविधांसाठी भरीव निधीची तरतूद करणे यावर सविस्तर चर्चा झाली. मंत्र्यांनी या सर्व विषयांवर तातडीने कार्यवाही करण्याचे संकेत दिले आहेत. या महत्त्वपूर्ण भेटीप्रसंगी रिसोड-मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख ॲड.नकूल देशमुख ,भाजप महिला संघटिका अमृता देशमुख, जिल्हा महामंत्री गजानन लाटे, ॲड. माधुरी देशमुख, माजी सभापती सुभाष खरात, तालुका अध्यक्ष अमोल भुतेकर,भूषण दांदडे, रेखा जहिरव यांची उपस्थिती होती. तसेच नगर परिषदेचे गटनेते ॲड. कृष्णा आसनकर, नगरसेवक किरण क्षीरसागर, माधुरी इरतकर,शामली डांगे, प्रीती जोगदंड,वैदही केदारे, स्नेहा लोथे, जया नकवाल, संजय बगडिया, सतीश इरतकर, अक्षय देशमुख यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

### विद्यार्थिनीचा दुर्दैवी मृत्यू

**▸विदर्भ केसरी। कळंब तालुका प्रतिनिधी : विरेंद्र चव्हाण**



कळंब : तालुक्यातील मेटीखेडा येथील रहिवासी कु. वैष्णवी लक्ष्मण घोडाम हिचा संशयित उष्माघातामुळे मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. वैष्णवी ही मातोश्री प्रमिलादेवी दुलीचंद राठोड कनिष्ठ विद्यालय, आसोली (ता. पांढरकवडा) येथे इयत्ता ११ वी कला शाखेत शिक्षण घेत होती. परीक्षा संपल्यानंतर घरी परतत असताना तिला मळमळ, उलटी अशी लक्षणे जाणवू लागली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पहाटे अचानक तिची प्रकृती गंभीर बिघडली. कुटुंबीयांनी तातडीने तिला प्राथमिक आरोग्य केंद्र, मेटीखेडा येथे दाखल केले. मात्र त्या ठिकाणी मुख्यालयी वैद्यकीय अधिकारी अनुपस्थित असल्याने आवश्यक उपचार मिळू शकले नाहीत. परिस्थिती गंभीर असल्याने वैष्णवीला पुढील उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथे हलविण्यात आले. मात्र तेथे पोहोचण्यापूर्वीच उशीर झाल्याने डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. मृत्यूचे नेमके कारण समजण्यासाठी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला असून, अहवालानंतरच खरे कारण स्पष्ट होणार आहे. दरम्यान, दि. ९ एप्रिल रोजी मेटीखेडा येथील मोक्षधाममध्ये तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. वैष्णवीच्या पश्चात आई-वडील, बहीण व लहान भाऊ असा परिवार आहे. तिच्या अकाली निधनाने गावात शोककळा पसरली आहे. दरम्यान, "प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक सोयी-सुविधा व वैद्यकीय अधिकारी उपस्थित असते, तर माझ्या मुलीचा जीव वाचला असता. तिला मळमळ, उलटी व ताप अशी लक्षणे दिसत होती," अशी व्यथा वैष्णवीचे वडील लक्ष्मण घोडाम यांनी व्यक्त केली. या घटनेमुळे ग्रामीण भागातील आरोग्य सुविधांच्या अपुऱ्या व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## बी.एड.विद्यार्थ्यांसाठी योग, व्यक्तिमत्त्व विकास व संभाषण कौशल्य कार्यशाळा संपन्न

**▸विदर्भ केसरी। सतीश भालेराव**




**नागपूर** शीलादेवी शिक्षण महाविद्यालय येथे बी.एड. अभ्यासक्रमांतर्गत विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास प्राचार्या डॉ.सुरेखा शर्मा व प्रा.डॉ. लिना तायवाडे प्रमुख उपस्थिती लाभली.

पहिल्या सत्रात बी.एड. चौथ्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी योग कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेस प्रा. जयश्री चनापे (प्रियदर्शनी शिक्षण महाविद्यालय) यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी योगाचे महत्त्व व आरोग्यदायी जीवनशैली याविषयी सविस्तर माहिती दिली. दुसऱ्या सत्रात 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. या सत्रात प्रा. अर्पणा चौधरी (गीता शिक्षण महाविद्यालय, नागपूर) यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास व प्रभावी संवाद याबाबत मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात बी.एड. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी 'संभाषण कौशल्य व देहबोली' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेस डॉ. नूतन डोंगरे, कार्यकारी प्राचार्या (बोंडे शिक्षण महाविद्यालय, खापरी) यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. सुजाता काळबांडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अवंतिका वानखेडे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. तसेच शिक्षकेतर कर्मचारी शैला बुटे, धरती जिभे, योगिता देवतळे इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रम अत्यंत उपयुक्त व ज्ञानवर्धक ठरला.




### जिल्हाकचेरीत अभिवादन

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

: महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

## राजुरा विधानसभा क्षेत्रात विकासाचा झंझावात

### आमदार देवराव भोंगळे यांची 'लोकनेता' म्हणून ओळख

**▸विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड**



> ■ "दादांची कामाची पद्धत आणि सर्वसमावेशक स्वभाव यामुळेच आज विरोधी पक्षातील युवकही त्यांच्या कामाचे कौतुक करताना दिसत आहेत. भविष्यात राजुरा विधानसभा क्षेत्र विकासाचे मॉडेल म्हणून ओळखले जाईल, यात शंका नाही.
>
> ■ आज संपूर्ण जिल्ह्यात देवराव दादांच्या कार्याचे कौतुक होत असून, आगामी काळात त्यांच्या नेतृत्वाखाली राजुरा क्षेत्राचा विकास अधिक वेगाने होईल, अशी खात्री जनतेला वाटत आहे.

देवराव दादाजी प्रतिमा लय भारी, सर्व युवा पिढी देवराव दारी..." हे शब्द सध्या राजुरा विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक कोपऱ्यात घुमत आहेत. सत्तेचा ताम्रपट न घेता, केवळ जनसेवेचा वसा घेतलेले आमदार देवराव दादा भोंगळे यांनी आपल्या कार्यशैलीने संपूर्ण जिल्ह्यात एक वेगळाच ठसा उमटवला आहे. केवळ राजकीय नेते म्हणून नव्हे, तर 'सर्वसामान्यांचा माणूस' म्हणून त्यांनी जनतेच्या मनात हक्काचे घर निर्माण केले आहे.

देवराव दादांकडे जाणारा कोणताही तरुण, मग तो कोणत्याही पक्षाचा का असेना, कधीही रिकाम्या हाताने परतत नाही, हा आजवरचा इतिहास आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष असताना त्यांनी केलेल्या कामांची पावती आणि युवा पिढीला दिलेले योगदान यामुळेच आज ते आमदार म्हणून विधानसभेत या क्षेत्राचे प्रतिनिधित्व करत आहेत. तरुणांच्या अडचणी समजून घेणे आणि त्या तातडीने सोडवणे, यामुळे आजची युवा पिढी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे आमदार झाल्यापासून देवराव दादांनी राजुरा, कोरपना, गोंडपिपरी आणि जिवती या चारही तालुक्यांच्या सर्वांगीण विकासासाठी निधीचा ओघ सुरू केला आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे या भागातील अनेक रखडलेल्या विकासकामांना गती मिळाली आहे. विशेषतः: अनेक वर्षांपासून रखडलेला एमआयडीसीचा प्रश्न दादांनी मार्गी लावला आहे. यामुळे या भागातील सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, स्थानिक युवकांमध्ये रोजगाराची नवी उमेद जागी झाली आहे. रस्ते, पाणी आणि सिंचनाच्या सोयींसाठी त्यांनी कोट्यवधींचा निधी खेचून आणला असून, ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यास सुरुवात केली आहे. देवराव दादांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही 'आमदार' असल्याचा बडेजाव मिरवला नाही. सत्तेच्या खुर्चीवर बसूनही ते सामान्य जनतेत मिसळून त्यांचे प्रश्न जाणून घेतात. "सामान्य माणसाचा प्रश्न हा माझा प्रश्न" ही त्यांची भूमिका त्यांना इतर नेत्यांपेक्षा वेगळे ठरवते.

## पुसद शहर पोलिसांच्या उपस्थितीत बोरी खुर्द येथे धार्मिक स्थळांवरील विनापरवाना भोंगे स्वेच्छेने हटविले

**▸विदर्भ केसरी। पुसद**



पोलिस स्टेशन पुसद शहर हद्दीतील ग्राम बोरी खुर्द येथे विविध धार्मिक स्थळांवर विनापरवाना लावण्यात आलेले भोंगे स्थानिक विश्वस्तांनी स्वेच्छेने व स्वयंस्फूर्तीने काढून घेतल्याची घटना शनिवारी (दि. ११) घडली. ही कारवाई पुसद शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार सेवानंद वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

ग्राम बोरी खुर्द येथील जामा मस्जिद, अली मुर्तुजा मस्जिद, श्री संत दुधादारी महाराज मंदिर तसेच धम्मभूमी बुद्ध विहार या धार्मिक स्थळांवर लावलेले विनापरवाना भोंगे संबंधित विश्वस्त व पदाधिकाऱ्यांनी पोलिसांच्या उपस्थितीत काढून घेतले. यावेळी जामा मस्जिदचे विश्वस्त शेख यासीन शेख रज्जाक, शेख सलीम शेख अकबर, अली मुर्तुजा मस्जिदचे जाबाज खा समशेर खा व शेख रहीम, श्री संत दुधादारी महाराज मंदिराचे अध्यक्ष Sitaram भाकरे, नारायण जारंडे (तंटामुक्त समिती अध्यक्ष), कृष्ण पारत (पोलीस पाटील) तसेच धम्मभूमी बुद्ध विहारचे शरद जाधव, अमोल खंदारे व विश्वनाथ मनवर उपस्थित होते.

पोलीस स्टेशन पुसद शहरचे ठाणेदार सेवानंद वानखडे, गोपनीय अंमलदार अभिमन्यू चव्हाण व नितेश भालेराव यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया शांततेत पूर्ण झाली. यावेळी उपस्थित सर्वांनी कायदा व नियमांचे तंतोतंत पालन करण्याचे आश्वासन पोलीस प्रशासनाला दिले. पोलिसांनीही संबंधित विश्वस्तांचे सहकार्याबद्दल आभार मानले असून, पुसद शहरातील इतर धार्मिक स्थळांच्या विश्वस्तांनीही विनापरवाना लावलेले भोंगे स्वेच्छेने काढून घेऊन कायदेशीर कारवाई टाळावी, असे आवाहन करण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. स्थानिक नागरिकांना विश्वासात घेऊन ही कारवाई शांततेत पार पडल्याचे पोलिसांनी सांगितले

## लोकार्पण सोहळ्यात उठली विकासाची मागणी

### ढाणकीला मिळाली तीन नवीन पोलीस वाहने

**▸विदर्भ केसरी।ढाणकी (प्रतिनिधी): मिलिंद चिकाटे**



बिटरगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या ढाणकी पोलीस चौकी येथे आज तीन नवीन अत्याधुनिक पोलीस वाहनांचा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. मात्र, या केवळ शासकीय सोहळ्याचे स्वरूप न राहता, स्थानिक प्रलंबित प्रश्नांवरून या प्रसंगी विकासाची जोरदार मागणी करण्यात आली.आमदार किसनराव वानखेडे यांच्या हस्ते या वाहनांचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून नितीन भूतडा यांची उपस्थिती होती. ठाणेदार पांडुरंग शिंदे यांनी या सोहळ्याचे आयोजन केले होते. यावेळी व्यासपीठावर उपनगराध्यक्ष दत्त दिगंबर वानखेडे, बाळू पाटील चंद्रे, खाजा भाई कुरेशी, रोहित वर्मा, सूर्यकांत वासमवार, बाळा भाऊ योगेवार, गजानन मिटकरे, रमेश गायकवाड, महेश पिंपरवार, परमेश्वर निमलवाड, अनिल गंगरपाड, पंकज केशेवाड, मल्हार चंद्रे, नागेश रातोळे यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते. बाळू पाटील चंद्रे यांनी पोलीस प्रशासनाचे अभिनंदन करतानाच काही गंभीर समस्यांकडे लक्ष वेधले. ते म्हणाले की: ढाणकीजवळील नाल्याला थोड्या पावसातही पूर येतो. यामुळे वाहने सोडाच, पायी चालणेही अशक्य होते आणि 'बंदी' भागातील गावांचा संपर्क पूर्णपणे तुटतो. बिटरगाव येथील पोलीस वसाहत इंग्रजकालीन असून ती अत्यंत जीर्ण झाली आहे. तिथे नवीन वसाहत निर्माण करणे काळाची गरज आहे.नागरिकांच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत आमदार किसनराव वानखेडे यांनी जाहीर केले की, ढाणकीजवळील पुलाच्या कामाला मंजुरी मिळाली असून त्याचे काम लवकरच सुरू होईल. तसेच, पोलीस वसाहतीचा प्रश्नही तातडीने मार्गी लावून नवीन वसाहत मंजूर करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.प्रास्ताविकात ठाणेदार पांडुरंग शिंदे यांनी सांगितले की, बिटरगाव पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्र मोठे असून त्यात अनेक दुर्गम गावांचा समावेश आहे. अशा वेळी तातडीने घटनास्थळी पोहोचण्यासाठी वाहनांची उणीव भासत होती. आता तीन नवीन अत्याधुनिक वाहने उपलब्ध झाल्याने रात्रीची गस्त आणि गुन्हे नियंत्रण कामात मोठी मदत होणार आहे.कार्यक्रमाचे स्वागत पोलीस उपनिरीक्षक सागर अन्नमवार, मोहन चाटे, रवी गिते, रोशन सरनाईक, हिंमत जाधव आणि राहुल कोकरे यांनी केले.

दैनिक विदर्भाचा मानबिंदू
विदर्भ केसरी
रविवार, १२ एप्रिल २०२६ | ४

# विदर्भ GOOD MORNING

!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!




## वेशभुषा स्पर्धा...

यवतमाळ : क्रांतीज्योती महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वेशभूषा स्पर्धेत 'मी सावित्री' अशी पाटी हाती धरीत आकर्षक वेशभूषा साकारली.

### महत्त्वाचे



## दुसऱ्याही दिवशी आग विझविणे सुरूच

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

शहरालगत असलेल्या सावरगड येथील कचरा डेपोला शुक्रवारी (दि. १०) सकाळी भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. सकाळी १०.३० च्या सुमारास लागलेली ही आग वाऱ्यामुळे इतकी रौद्र झाली की, ती विझवण्यासाठी यवतमाळसह आजूबाजूच्या तीन तालुक्यांतील अग्निशमन दलाला पाचारण करावे लागले. तब्बल सात तासांच्या अथक परिश्रमानंतर आग आटोक्यात आली तरी सर्वत्र धुराचेचे लोळ उठतच होते. शनिवारी देखील आग विझविण्याचे काम अग्निशामक दलाकडून सुरूच होते.प्राथमिक अंदाजानुसार, कचरा डेपोच्या बाजूला असलेल्या शेतातील कचरा किंवा धुरा जाळण्यात आला होता. या धुऱ्यावरील आग वाऱ्याच्या वेगाने कचरा डेपोपर्यंत पोहोचली आणि काही क्षणातच संपूर्ण परिसरात आगीचे लोळ उठले. वाळलेला कचरा आणि प्लास्टिकमुळे आगीने भीषण रूप धारण केले होते.

आगीची माहिती मिळताच यवतमाळ नगर परिषदेच्या अग्निशामनच्या ३ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. मात्र, आगीची दाहकता पाहता राळेगाव, घाटंजी आणि कळंब येथूनही प्रत्येकी १-१ गाडी मागविण्यात आली. अशा एकूण ६ अग्निशमन गाड्या, जीटिंग मशीन आणि जेसीबीच्या साहाय्याने कचरा उपसून आग विझवण्याचे काम युद्धपातळीवर करण्यात आले. कचरा डेपोला लागलेल्या या आगीमुळे निर्माण झालेला विषारी धूर सावरगड आणि परिसरातील गावांमध्ये पसरला होता. यावेळी अग्निशमन अधिकारी विनोद खरात यांच्या नेतृत्वात आग विझविण्यात आली. चालक विपीन रहांदले, फायरमन हेमंत डोंगरे, रवी चौधरी, निखिल पाठक, राहुल यादव, मनीष पवार, रमेश चौधरी, राजू इंगळे, सागर वाढई, योगेश यादव आणि नितीन जगताप यांनी जिवाची पर्वा न करता धुराच्या लोटात शिरून आग विझवली.

## सरसंघचालक मोहन भागवत यांचे आगमन

**विदर्भ केसरी।पांढरकवडा :**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत हे तेलंगणातील निझामाबाद जिल्ह्यातील कंदकुर्ती येथे आयोजित लोकार्पण कार्यक्रमासाठी रवाना होत असताना ११ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ११.१५ वाजता पांढरकवडा येथे आगमन झाले. त्यांच्या भेटीच्या पार्श्वभूमीवर शहरात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून, सर्वत्र सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली आहे. या दौऱ्यादरम्यान मोहन भागवत यांनी शहरातील आखाडा वार्ड परिसरातील प्रोफेसर कॉलनी येथे संघाचे जिल्हा सहकार्यवाह कुलदीप राशतवार यांच्या निवासस्थानी भेट देऊन येथे ते संघाच्या निवडक कार्यकर्त्यांशी संवाद साधून भोजन केले. या भेटीत त्यांच्या सोबत संघाचे प्रांत प्रचारक गणेश शेटे हेही उपस्थित असल्याची माहिती मिळाली आहे. प्रारंभीच्या भेटीनंतर मोहन भागवत हे कंदकुर्ती (तेलंगणा) येथील कार्यक्रमासाठी ते १:३० वाजता पुढे रवाना झाले. कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर ते पुन्हा पांढरकवडा येथे परत येणार असून, शहरातील संघ कार्यालयात त्यांचा मुक्काम राहणार आहे.

# गुलामीचे प्रतीक मानली जाणारी वाद्य, आता आमच्या संघर्षाचा आवाज !

## जागर समतेचा (मुंबई) जलसाचे अद्वितीय सादरीकरण...

**विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

धम्मनायक सम्राट अशोक, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित धमक्रांती प्रज्ञापर्व मंचावर जागर समतेचा आयोजित. ""कधीकाळी हीच वाद्य गुलामीचे प्रत्येक मानले जायची परंतु आता हीच वाद्य आमच्या संघर्षाचा आवाज बनली आहे ,"स्वातंत्र्याचा श्वास देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून जागर समतेचा यांनी मानवंदना दिली.

संत तुकोबाराय शब्दास अतिशय महत्त्व देतात. "शब्दच आमच्या जीवाचे जीवन, शब्दच जनलोका वाहू धन, शब्दाचे गौरव पूजा करून" संत तुकोबारायाची महती विशद केली... "स्त्री पुरुषे सर्व कष्टकरी व्हावे कुटुंबा पोसावे आनंदाने || नित्य मुली-मुलां शाळेत घालावे अन्नदान द्यावे विद्यार्थ्यास ||" महात्मा फुले यांच्या सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकातील काव्य.... पहिली माझी ओवी ग सावित्रीच्या बुद्धीला.! स्त्रियांच्या शिक्षणाचा पाया तू घातला.!

दुसरी माझी ओवी गायली तिच्या ग धैर्याला.! दगड गोटे खाऊनी चालवली तू शाळा..! ज्ञानज्योत लावीन तुला ग नमन,बंधुता जागवीन संघटित करीन...! अशा प्रकारच्या सावित्रीच्या ओव्या, संत तुकाराम चे अभंग, महात्मा फुले यांचे विचार, शाहीर वामनदादा कर्डक यांचे परिवर्तनशील गीताचे सादरीकरण करून प्रबोधनाच्या विचाराचा समतेचा जागर कलेतून सादर करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अप्पाराव मैंद, प्रमुख उपस्थिती महेश हंबर्डे , ऍड, बाळासाहेब वाठोरे एड, वाय एम.जांभुळकर, मिलिंद हटेकर,डॉ अतुल रुणवाल, डॉ. रवींद्र वडते, डॉ रामचंद्र राठोड,निखिल गादेवार, सुखदेवराव भगत,भीमराव उंदरे, नरेंद्र पाटील, (पत्रकार) राजेश ढोले इत्यादींची




प्रमुख उपस्थिती होती. तसेच धम्मक्रांती प्रज्ञापर्व अध्यक्ष प्रा.सुनील खाडे यांच्या सह विचार पीठावर अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला परिवर्तन बहुउद्देशीय महिला मंडळ व पारमिता महिला मंडळ केली. सामूहिक पंचशील त्रिशरण घेण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महापुरुषाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जनार्दन गजभिये यांनी केले आभार प्रदर्शन देवेंद्र खडसे यांनी मानले. या कार्यक्रमाला पुसद तालुक्यातील बहुसंख्य धम्म बांधव महिला, युवक ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्हायरल रीलवरून टॅक्सी चालकांचा संताप

**विदर्भ केसरी। दाबोळी :**

गोव्यात एका व्हायरल इंस्टाग्राम रीलमुळे मोठा वाद निर्माण झाला असून, टॅक्सी चालकांनी संबंधित इन्फ्लुएन्सरविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. दक्षिण गोवा टॅक्सी असोसिएशनने आरोप केला आहे की, व्हिडीओमध्ये टॅक्सी चालकांवर अवाजवी भाडे आकारल्याचा चुकीचा ठपका ठेवत त्यांना 'टॅक्सी माफिया' असे संबोधण्यात आले आहे. असोसिएशनच्या म्हणण्यानुसार, संबंधित प्रवासाचे भाडे आधीच ठरवून दिले गेले होते आणि ते पूर्णपणे नियमांनुसार होते. मात्र, व्हिडीओमधील दावे खोटे व दिशाभूल करणारे असून त्यामुळे टॅक्सी चालकांच्या प्रतिष्ठेला धक्का बसला आहे. या प्रकरणी टॅक्सी चालकांनी वास्को पोलीस स्थानकाशी संपर्क साधत अधिकृत तक्रार नोंदवली आहे

# बारदाण्याअभावी नाफेडची तूर-चना खरेदी बंद

## तीन दिवासात खरेदी सुरू करा अन्यथा बारदाना आंदोलन शिवसेनेचा पालकमंत्री व प्रशासनाला आंदोलनाचा इशारा



**विदर्भ केसरी। अमोल धवसे**

नांदगाव खंडेश्वर नाफेडच्या खरेदी केंद्रावरील बारदाणा उपलब्ध नसल्यामुळे तूर व चना खरेदी दहा दिवसांपासून बंद आहे प्रशासनाने बारदाणा तीन दिवसांत उपलब्ध करून द्यावा अन्यथा तहसील कार्यालयात तीव्र आंदोलन छेडू असा इशारा शिवसेनेचे समन्वयक न.पं.गटनेते प्रकाश मारोटकर यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व तहसीलदार यांना निवेदन सादर करून दिला.

निसर्गाच्या अस्मानी संकटामुळे शेतकरी आधीच हवालदिल झाला आहे. त्यात खरेदी केंद्र बंद असल्याने याचा फायदा घेत व्यापारी कवडीमोल भावात शेतकऱ्यांचा माल खरेदी करत आहेत. प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे शेतकऱ्यांचा घाम गाळून पिकवलेल्या मालाला मातीमोल भाव मिळत असताना प्रशासन मात्र डोळे लावून बसले आहे

तातडीने युद्धपातळीवर ३ दिवसांत पुरेसा बारदाणा उपलब्ध करावा अन्यथा तहसील कार्यालयात बारदाणा आंदोलन करण्यात येईल असा तीव्र इशारा निवेदनातून शिवसेना ठाकरे गटानी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व तहसीलदार यांनी दिला यावेळी शिवसेना विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर शिवसेनेचे बाळासाहेब राणे न.पं.सभापती वासुदेव लोखंडे, निलेश इखार लीलाधर चौधरी नंदु राणे शुभम रावेकर अक्षय हिवराळे पवन शिरभाते इत्यादि उपस्थित होते.

### बारदाना संपणे सरकारचे अपयश :- प्रकाश मारोटकर

**■ खरेदी सुरु होऊन एक महिन्याचा कालावधी सुद्धा झाला नाही आणि खरेदी केंद्रांवरील बारदाना संपतो, सरकारचे अपयश समजावे कि व्यापाऱ्यांशी साटेलोटे कारण ३० एप्रिल हि खरेदी अखेरची मुदत आहे त्यामुळे तात्काळ बारदाणा उपलब्ध न झाल्यास तीव्र आंदोलन छेडू असा इशारा प्रकाश मारोटकर यांनी दिला**

# घरात घुसून महिलेचा विनयभंग

## उमरखेड ठाण्यात दोघांवर गुन्हा नोंद

**विदर्भ केसरी। उमरखेड :**

रात्रीदरम्यान अचानक घरात घुसून एका महिलेचा चक्क पती व सासऱ्यापुढेच विनयभंग करण्यात आला. घरात घुसलेल्या या दोन आरोपींनी यावेळी पीडितेच्या पतीला आणि सासऱ्याला मारहाणही केली. ही गंभीर घटना १० एप्रिलच्या रात्री ११.३० वाजताच्या सुमारास घडली. पोलिसांनी दोन आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केले आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेच्या रात्री फिर्यादी महिला आपल्या पती व सासऱ्यासह घरात होती. त्यावेळी अचानक दरवाजावर जोरात आवाज झाला. दरवाजा उघडताच आरोपी गजानन अशोक डहाळे (२४) व अथर्व विजय माळवे (२४) दोन्ही रा, उमरखेड हे जबरदस्तीने घरात घुसले. यावेळी आरोपी अथर्व माळवे याने फिर्यादीचा हात धरून तिला जवळ ओढत तिचा विनयभंग केला.

महिलेला त्याच्या तावडीतून सोडवण्यासाठी तिचे पती व सासरे पुढे आले असता, दोन्ही आरोपींनी त्यांना धक्काबुक्की करून मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणात पीडितेने उमरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यावरुन पोलिसांनी दोघांवर गुन्हा नोंद केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार प्रकाश बोंबले करीत आहे.

# आयपीएल सट्ट्यावर धाड; तिघांसह ५.६४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ केसरी। यवतमाळ**



नागपूर–तुळजापूर हायवेवर मोबाईलद्वारे सुरू असलेल्या आयपीएल क्रिकेट सट्ट्यावर स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी धाड टाकत तिघा आरोपींना अटक करून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त केला आहे.

दि. ०९ एप्रिल २०२६ रोजी रात्री सुमारे ११.३० वाजताच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पथक गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली की, तुळजापूर–नागपूर हायवेवरील नरसापूर येथील प्रवासी निवाऱ्यासमोर उभी असलेल्या चारचाकी वाहनात काही इसम मोबाईलवर आयपीएल सामन्यावर पैशांची बाजी लावत आहेत. मिळालेली माहिती वरिष्ठांना कळवून तात्काळ कारवाईचे आदेश घेण्यात आले. त्यानुसार पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले असता, नमूद ठिकाणी हुंडाई EXTER (क्रमांक MH 29 CJ 0288) या वाहनात तीन इसम बसून मोबाईलद्वारे आयपीएल सट्टा खेळताना आढळून आले. त्या वेळी Lucknow Super Giants विरुद्ध Kolkata Knight Riders हा सामना सुरू होता. पोलिसांनी तात्काळ तिघांना ताब्यात घेत त्यांची चौकशी केली असता त्यांनी आपली नावे पुढीलप्रमाणे सांगितली: देवेंद्र दिलीपकुमार कटीपारा (वय २८, रा. परळवाडी कॅम्प, यवतमाळ) आशुतोष लक्ष्मीकांत गुप्ता (वय २९, रा. मारवाडी चौक, यवतमाळ) दिलेश संतोष कुकुलवार (वय २८, रा. चापनवाडी, जि. यवतमाळ)

आरोपींकडील मोबाईलची पंचासमक्ष तपासणी केली असता ते संबंधित सामन्यावर पैशांची बाजी लावून हार-जीत स्वरूपाचा जुगार खेळत असल्याचे निष्पन्न झाले. या कारवाईत पोलिसांनी आरोपींकडून सट्टा खेळण्यासाठी वापरण्यात आलेले ४ मोबाईल फोन (अंदाजे किंमत १,६०,००० रुपये), रोख रक्कम ४,८७० रुपये तसेच सट्ट्यासाठी वापरण्यात आलेले चारचाकी वाहन (अंदाजे किंमत ४,००,००० रुपये) असा एकूण ५,६४,८७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर प्रकरणी आरोपींविरुद्ध जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपासासाठी त्यांना कळंब पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मनीष गावंडे, पोउपनि गजानन राजगोलू, सईद साजीद, योगेश गटलेवार, अजय डोळे, प्रशांत हेडाउ, रूपेश पाली, योगेश डगवार, सुनिल पैठणे, देवेंद्र होले, आकाश सूर्यवंशी आदींच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# गोंडपिपरीत 'ॲक्शन मोड'मध्ये तहसीलदार

## कर्तव्यात कसूर करणाऱ्या ९ कर्मचाऱ्यांना 'कारणे दाखवा' नोटीस!

**विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड -:**

तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन आणि रेती-मुरुम तस्करीने उच्छाद मांडला असून, यावर आळा घालण्यासाठी नेमलेले भरारी पथकच 'बेपत्ता' असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत तहसीलदार शुभम बाहकर यांनी आपला आक्रमक पवित्रा धारण केला आहे. कर्तव्यात कमालीची निष्क्रियता दाखवणाऱ्या पथकातील नऊ कर्मचाऱ्यांना त्यांनी 'कारणे दाखवा' नोटीस बजावली असून, या धडक कारवाईमुळे महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

गोंडपिपरी तालुक्यात अवैध रेती आणि मुरुम तस्करी रोखण्यासाठी तहसीलदारांनी तालुकास्तरीय भरारी पथकाची नियुक्ती केली होती. या पथकावर तस्करी रोखण्याची आणि कारवाई करण्याची मोठी जबाबदारी सोपवण्यात आली होती. मात्र, शुक्रवारी (दि. १० एप्रिल २०२६) हे पथक नेमून दिलेल्या वेळी आणि ठिकाणी फिरकलेच नाही. कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय हे कर्मचारी गायब राहिल्याने तस्करांना मोकळे रान मिळाले.

भरारी पथकाच्या निष्क्रियतेमुळे सामान्य जनतेतून तीव्र संताप व्यक्त होत होता. "तस्करी थांबवण्यासाठी नेमलेले अधिकारीच जर दांड्या मारत असतील, तर कारवाई होणार कशी?" असा संतप्त सवाल नागरिक विचारत होते. जनतेची ही मागणी आणि प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेऊन तहसीलदार शुभम बाहकर यांनी तातडीने कठोर पाऊल उचलले. त्यांनी नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, महसूल सेवक आणि ग्राम महसूल अधिकारी अशा एकूण नऊ कर्मचाऱ्यांना नोटीस बजावून ४८ तासांच्या आत लेखी स्पष्टीकरण मागवले आहे. तहसीलदारांनी स्पष्ट केले की, वारंवार तोंडी आणि लेखी सूचना देऊनही कर्मचाऱ्यांनी शासकीय कर्तव्याप्रती कमालीची उदासीनता दाखवली आहे. "तुमच्या या वागणुकीमुळे शासनाची शिस्त मोडली असून, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील तरतुदींचा भंग झाला आहे. तुमच्यावर प्रशासकीय कारवाईचा प्रस्ताव वरिष्ठांकडे का पाठवू नये?" असा थेट इशाराच या नोटिशीत देण्यात आला आहे.

**■ एकीकडे कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला गेल्यामुळे, दुसरीकडे अवैध धंदे करणाऱ्या तस्करांचेही धाबे दणाणले आहेत. तहसीलदारांच्या या 'डॅशिंग' भूमिकेमुळे तालुक्यातील अवैध धंदे थांबतील, अशी अपेक्षा सर्वसामान्यांकडून व्यक्त होत आहे. आता या नोटिशीनंतर संबंधित कर्मचारी काय उत्तर देतात आणि त्यांच्यावर नेमकी काय कारवाई होते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.**

# विद्यार्थ्यांनी जिद्द चिकाटी ठेवून यश मिळवावे

## मूर्तिजापूरमध्ये 'स्पर्धा परीक्षा आणि आजचा विद्यार्थी' विषयावर व्याख्यान, हजारो विद्यार्थ्यांची ऐतिहासिक उपस्थिती

**विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

"स्पर्धा परीक्षेत येणारे अपयश हे अंतिम नसते, तर तो अनुभवाचा एक भाग असतो. अपयशाकडे नकारात्मकतेने न पाहता, त्यातून धडा घेऊन जो पुन्हा नव्या जोमाने उभा राहतो, तोच यशाचे शिखर गाठतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी खचून न जाता ध्येयाकडे वाटचाल करावी," असे प्रेरणादायी प्रतिपादन प्रसिद्ध मार्गदर्शक प्रा. विठ्ठल कांगणे* यांनी केले. जी. के. अकॅडमी, मूर्तिजापूरच्या वतीने आयोजित "स्पर्धा परीक्षा आणि आजचा विद्यार्थी" या विशेष व्याख्यानमालेत ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी विद्यार्थ्यांचा अभूतपूर्व प्रतिसाद पाहायला मिळाला.



सभागृह पडले अपुरे; उभे राहून ऐकले व्याख्यान*

कार्यक्रमाची व्याप्ती इतकी मोठी होती की, आयोजकांनी केलेली व्यवस्था अपुरी पडली. हजारो विद्यार्थ्यांच्या गर्दीमुळे सभागृह तुडुंब भरले होते. जागा न मिळाल्याने अनेक विद्यार्थ्यांनी तासनतास उभे राहून प्रा. कांगणे यांचे विचार ऐकले. मूर्तिजापूर परिसरातील युवकांमध्ये स्पर्धा परीक्षांबाबत असलेली ओढ या निमित्ताने अधोरेखित झाली.

यशाची त्रिसूत्री: सातत्य, शिस्त आणि नियोजन*

प्रा. कांगणे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत विद्यार्थ्यांना यशाचे तंत्र सांगितले. ते म्हणाले की, केवळ अभ्यास करून चालत नाही, तर त्याचे सूक्ष्म नियोजन आवश्यक आहे. माहितीच्या महापुरात नक्की काय वाचायचे आणि काय टाळायचे, याची निवड करता आली पाहिजे. मानसिक आरोग्य परीक्षेच्या काळात येणारा ताण-तणाव कसा हाताळावा, यावर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

### यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव.

**■ या कार्यक्रमाचे औचित्य साधून जी. के. अकॅडमीच्या माध्यमातून शासकीय सेवेत निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. सत्कारमूर्ती विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय संस्थेचे मार्गदर्शन आणि कठोर परिश्रमांना दिले.**

**विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी किडा न बनता, मूल्याधिष्ठित जीवन जगावे व समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखावी. माया नाईक*(अध्यक्षीय भाषणातून) कार्यक्रमाचे उद्घाटन संजय नाईक यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी माजी जि. प. शिक्षण व आरोग्य सभापती माया नाईक होत्या. व्यासपीठावर प्रा. गजानन वर्घट, ज्ञानेश टाले, सुनील सरदार, नगरसेविका शुभांगी सरनाईक आदी मान्यवर उपस्थित होते.**

**कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन जी. के. अकॅडमीचे संचालक रवि गोंडकार यांनी केले, तर सूत्रसंचालन अंबेचरण ननीर यांनी प्रभावीपणे पार पाडले. या व्याख्यानामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये एक नवा उत्साह संचारल्याची भावना व्यक्त होत आहे.**

# 'त्या' रस्त्यावरील अतिक्रमण हटवा

## त्रस्त नागरिकांची मागणी)

**विदर्भ केसरी। नागपूर**

तालुक्यातील ग्राम पंचायत ईसासनी परिसरातील वार्ड क्र.६ शांतीनगर येथील रहदारीच्या रस्त्यावर बेकायदेशीररित्या घराचे बांधकाम करून केलेले अतिक्रमण त्वरीत हटवण्याची मागणी त्रस्त नागरिकांनी केली आहे.

हा अतिक्रमित रस्ता येथील नागरिकाच्या ये-जा करनण्याचा मुख्य रस्ता आहे. येथील नागरिक यांच रस्त्यानी ग्राम पंचायत कार्यालयात, आठवळी बाजारात व बसस्टॉपवर ये-जा करतात. येथील बबली नामक महिलेने या रस्त्यावर अतिक्रमण करून घराचे बांधकाम सुरू केले आहे. त्यामुळे येथील नागरिकांना ये- जा करतांनी कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्यावरील अतिक्रमण त्वरीत हटवण्याची मागणी



निवेदनाद्वारे त्रस्त नागरिकांनी सरपंच व सचिव ग्राम पंचायत ईसासनी, ग्राम महसूल अधिकारी हिंगणा, तहसीलदार हिंगणा तहसील कार्यालय, गट विकास अधिकारी पंचायत समिती हिंगणा, पोलीस अधीक्षक एमआयडीसी हिंगणा व आमदार समीर मेघे यांना केली असून अतिक्रमण धारक महिलेला स्थानिक वार्ड मेंबरच अभय देत असल्याचा आरोप त्रस्त नागरिकांनी निवेदनाद्वारे केला आहे. मागणीचे निवेदन देणाऱ्यांन मध्ये सुरखा भानसे, सोनु आत्राम, अनिता मेंढे, करिश्मा कुर्वे, मयुरी बनकर, संजय कुर्वे, कविता फुन्ने ,अनिल येडे, सपना रंगारी दिपा गेडाम छाया सोमकुवर ,सोनाली सोरदे,स्वर्णा खोब्रागडे, सुषमा चव्हाण, धुरपता हरिणखेडे, अनिता देठे, करिश्मा वैरागडे, माधुरी सिंह,अजय रघूवंशी ,गिता पारधी संतोष लिल्हारे वंदना रामटेके, तुलाराम बनकर,कुसूम आत्राम, लक्ष्मी धोनी आदींसह अनेक त्रस्त नागरिकांचा समावेश आहे.

चंद्रपूर TODAY GOOD MORNING

BREKING NEWS

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू

रविवार, दि. 12 एप्रिल 2026



Selected

## भिसी-चिमूर मार्गावर कार अपघात ; पाच जखमी, दोन गंभीर..!




चिमूर :- भिसी-चिमूर महामार्गावर शुक्रवारी (१०) दुपारी २ वाजेच्या सुमारास भरधाव कारचा भीषण अपघात झाला, ज्यात पाच युवक जखमी झाले आहेत. या जखमींपैकी सिद्धांत बोरकर आणि हर्षल हिवरे यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना तातडीने नागपूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले. भिसीपासून एक किलोमीटर अंतरावर असलेल्या कालव्याजवळ हा अपघात झाला. अपघातग्रस्त कार रोशन जयस्वाल यांची (भिसी) एम. एच. ४० ए.सी. ४४४० क्रमांकाची कार होती, जी चालक सिद्धांत बोरकर घेऊन मित्रांसह चिमूरकडे जात होती. कारमध्ये अमित शेंडे, रितेश खडसंग, हर्षल हिवरे, सागर गोंडाने आणि अजय गोंडाने (सर्व रा. धामणगाव व भिसी) हेही होते. पोलिसांच्या माहितीनुसार, कालव्याजवळ एका टिप्परला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करताना चालक सिद्धांत बोरकर याचे नियंत्रण सुटले. कार रस्त्याखाली शेतात शिरली आणि तीन-चार पलटी मारून बांधावर आदळली. या भीषण अपघातात सिद्धांत बोरकर आणि हर्षल हिवरे गंभीर जखमी झाले, तर इतर तीन प्रवासी किरकोळ जखमी आहेत.

---

## चंद्रपूर जिल्ह्यात सौम्य भूकंपाचे धक्के : हरदोना गाव केंद्रबिंदू..!

चंद्रपूर :- जिल्ह्यात शनिवारी ११ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ४:२२ वाजून १२ सेकंदांनी सौम्य भूकंपाचे धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता रिक्टर स्केलवर ३.४ इतकी नोंदविण्यात आली आहे. या भूकंपाचे स्थानांक अक्षांश १९.७४२ उत्तर व रेखांश ७९.२४० पूर्व असून, तो जमिनीखाली सुमारे १० किलोमीटर खोलीवर निर्माण झाला. चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील हरदोना गाव हे जिल्ह्यातील प्रमुख केंद्रबिंदू मानले जात आहे तसेच तेलंगणातील करीमनगर हा भूकंपाचा मुख्य केंद्रबिंदू असल्याची माहिती समोर आली आहे. भूकंपाचे धक्के सौम्य स्वरूपाचे असल्यामुळे कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही. मात्र, अचानक धक्क्यांमुळे काही भागात नागरिकांमध्ये क्षणिक भीतीचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, ग्रीन प्लॅनेट सोसायटीचे अध्यक्ष प्रा. सुरेश चोपणे यांनी मत व्यक्त करताना सांगितले की, गोदावरी नदीचे पाणी जमिनीत झिरपल्यामुळे भूगर्भातील हालचालींना चालना मिळून अशा प्रकारचे सूक्ष्म भूकंप होण्याची शक्यता असते. प्रशासनाने नागरिकांना घाबरून न जाता सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

---

## कुणकुमेश्वर देवस्थान परिसरातील उघडी बोरवेल; कारवाईची मागणी



सिरोंचा :- तालुक्यातील कुणकुमेश्वर देवस्थान परिसरात खोदण्यात आलेली बोरवेल पाणी न लागल्याने तशीच उघडी ठेवण्यात आली आहे. संबंधित खड्डा अद्याप बुजविण्यात आलेला नसल्याने परिसरात येणाऱ्या भक्तांच्या तसेच जनावरांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.या गंभीर बाबीकडे लक्ष वेधत रवि बारसागंडी, सिरोंचा तालुका सचिव यांनी प्रशासनाकडे तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. उघडा बोरवेल खड्डा सुरक्षिततरित्या बुजवून परिसरात संरक्षणात्मक उपाययोजना कराव्यात, अन्यथा भविष्यात कोणताही अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागावर राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे. प्रशासनाने तातडीने पाहणी करून योग्य ती कार्यवाही करावी, अशी नागरिकांचीही मागणी आहे.

# नारीशक्ती वंदन विधेयकामुळे महिलांचा सन्मान

## भाजपा महिला आघाडी गडचिरोलीची "नारी वंदन" नियोजनात्मक बैठक संपन्न

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे

गडचिरोली :- नारीशक्ती वंदन विधेयक हे भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानले जात आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या महिलांच्या राजकीय आरक्षणाच्या मागणीला या विधेयकामुळे न्याय मिळाला आहे. या निर्णयामुळे महिलांना निर्णयप्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याची संधी मिळणार असून त्यांच्या नेतृत्वगुणांना चालना मिळणार आहे या विधेयकामुळे खरोखरच महिलांचा खरा सन्मान आहे असे प्रतिपादन आरतीताई वानखेडे नारीशक्ती वंदन गडचिरोली जिल्हा प्रभारी यांनी केले. मा. आमदार डॉ. मिलिंदजी नरोटे यांच्या जनसंपर्क कार्यालयामध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. भाजपा जिल्हाध्यक्ष प्रा. रमेशजी बारसागडे यांच्या अध्यक्षतेखाली तर छायाताई दंडारे विशेष निमंत्रित सदस्य तथा माजि जिल्हाध्यक्ष ग्रामीण अमरावती, योगिताताई पिपरे जिल्हाध्यक्ष महिला आघाडी माजी नगराध्यक्ष तथा नगरसेविका गडचिरोली, मा. प्रनोतीताई निंबोळकर नगराध्यक्ष नगरपरिषद गडचिरोली, डॉ. चंदाताई कोडवते भाजपा राज्य परिषद सदस्य, योगिताताई भांडेकर माजी जिल्हा परिषद अध्यक्ष गडचिरोली, रोशनीताई वरघंटे तालुकाध्यक्ष गडचिरोली यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक संपन्न झाली.

या बैठकीचा मुख्य उद्देश मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी महिलांसाठी घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हा होता. लोकसभा व विधानसभा




निवडणुकांमध्ये महिलांसाठी 33 टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णयाचे स्वागत करीत या विधेयकाला समर्थन देण्यासाठी महिला आघाडीच्या वतीने 11 एप्रिल ते 18 एप्रिल यादरम्यान विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार करण्यात आला.

बैठकीत खालील कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. १) भाजपा महिला आघाडी जिल्हा गडचिरोलीच्या वतीने गडचिरोली येथे पदयात्रा व रॅलीचे आयोजन दिनांक 15 एप्रिल 2026 रोजी दुपारी तीन वाजता करण्यात येत आहे, २) बिल समर्थन मिस कॉल 96 67 17 33 33 या नंबर वर मिस कॉल करणे, ३) सोशल मीडिया वरून प्रत्येक प्लॅटफॉर्म वरुन वायरल करणे, ४) विरोधी पक्षातील महिला नेत्यांची पुष्पगुच्छ देत भेट घेणे व या अधिनियमासाठी समर्थन घेणे, ५) जिल्ह्यातून ५००० पोस्टकार्ड सर्व सामान्य महिला फळ/फुल/ मच्छी विक्रेत्या/लाभार्थी महिला /बचत गट महिला यांचे या बिल संदर्भात धन्यवाद मोदीजी पोस्टकार्ड वर सही घेने, ६)महिला संमेलन घेने, ७)नारीशक्ती दीवार तयार करने, ८) धन्यवाद मोदीजींचे 100 व्हिडिओ बनवून घेणे व त्यांचा प्रसार करणे, ९)नारीशक्ती वंदन अधिनियमाच्या अभिनंदनाचे बॅनर लावणे.

बैठकीला मा. प्रतिभाताई चौधरी ज्येष्ठ कार्यकर्ते भाजपा, मा. प्रीतीताई शम्भरकर जिल्हा महामंत्री, वर्षाताई शेडमाके जिल्हा सचिव, लताताई पुंगाटे महामंत्री, किरणताई चचाने तालुका अध्यक्ष गडचिरोली, कविताताई किरणे तालुका अध्यक्ष चामोशी, सीमाताई कन्नमवार शहर अध्यक्ष गडचिरोली, अर्चनाताई बोरकुटे जिल्हा महामंत्री, माधवीताई पेशेट्टीवार उपाध्यक्ष, शिल्पाताई राय उपाध्यक्ष रंजनाताई कोडाप जिल्हा सचिव, पल्लवीताई बारापात्रे, अर्चनाताई ढोरे तालुकाध्यक्ष वडसा ग्रामीण, शिल्पाताई हेमके नगरसेविका, गुड्डी मारभते नगरसेविका, कोमलताई नैताम नगरसेविका, साक्षीताई बोलूवार नगरसेविका, अर्चनाताई निंबोड नगरसेविका, लताताई लाटकर माजी नगरसेविका. अलकाताई पोहनकर माजी नगरसेविका, वैष्णवी नैताम माजी नगरसेविका महिला आघाडी पदाधिकारी व कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. बैठकीचे आयोजन मा.सौ. योगिताताई पिपरे जिल्हाध्यक्ष भाजपा महिला आघाडी (माजी नगराध्यक्ष) तथा नगरसेविका गडचिरोली यांनी केले, सूत्रसंचालन अर्चनाताई बोरकुटे जिल्हा महामंत्री यांनी केले तर आभार सीमाताई कन्नमवार शहराध्यक्ष यांनी मानले.

## भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकपा) च्या पाठपुराव्याला यश..!

विदर्भ केसरी । सिरोंचा

सिरोंचा :- तालुक्यातील झिंगानूर परिसरात महाआयटीची ऑप्टिकल फायबर केबल तुटल्यामुळे मोबाईल नेटवर्क व इंटरनेट सेवा पूर्णपणे ठप्प झाली होती. यामुळे नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, व्यावसायिक तसेच शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या गंभीर समस्येबाबत भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकपा) तर्फे मुख्य तंत्रज्ञान अधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन तात्काळ दुरुस्तीची मागणी करण्यात आली होती. जिल्हा गडचिरोली सहसचिव सचिन मोतकुलवार, सिरोंचा तालुका सचिव रवि बारसागंडी, तसेच समाजसेवक रामचंद्र कुमारी, सुरज भाऊ आणि लक्ष्मण ओडेटी यांनी संयुक्तपणे हा पाठपुरावा केला.



भाकपाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून संबंधित विभागाने फायबर केबल दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. लवकरच नेटवर्क सेवा पूर्ववत होणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, तसेच नियमित देखभाल व्यवस्था सुनिश्चित करावी, अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी केली आहे. नागरिकांच्या हितासाठी पुढेही ठाम भूमिका घेणार असल्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

## भामरागड पंचायत समितीत सुटीच्या दिवशी निविदेचा खेळ; एकाच कंत्राटदाराला कोटींची कामे..!

विदर्भ केसरी । गडचिरोली

जिल्ह्यातील भामरागड पंचायत समितीतून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शासकीय सुटीच्या दिवशी संगनमताने निविदा प्रक्रिया उरकून मर्जीतील कंत्राटदाराला तब्बल ६ कोटींची कामे बहाल केल्याचा आरोप करण्यात आला आहे. सुटीच्या दिवशी निविदा :- १ मार्च २०२६ रोजी शासकीय सुटी असतानाही बीडीओ, अभियंता आणि कंत्राटदारांनी मिळून ही प्रक्रिया राबवल्याचा दावा.

आमदारांचा आक्षेप: आमदार




धर्मरावबाबा आत्राम यांनी या गैरप्रकाराबाबत जि.प. सीईओ सुहास गाडे यांच्याकडे लेखी तक्रार केली असून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

कामाचा तपशील: 'आदिम जमाती संरक्षण व विकास कार्यक्रमांतर्गत' कियर येथील बंदिस्त नाली बांधकामाचे कंत्राट वादाच्या भोवऱ्यात.

नियमभंग: महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे सरळसरळ उल्लंघन झाल्याचा आरोप. या प्रकरणावर आता जिल्हा परिषद प्रशासन काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जि.प. सीईओ सुहास गाडे यांनी चौकशीचे आश्वासन दिले आहे.

> "शासकीय नियमांची पायमल्ली करणाऱ्यांना पाठीशी घातले जाणार नाही. पदाचा गैरवापर करणाऱ्या बीडीओ आणि अभियंत्याला तत्काळ निलंबित करावे."
>
> **-धर्मरावबाबा आत्राम, आमदार.**

## भाकपाच्या पाठपुराव्याने गोरगुटाटा येथे ट्रान्सफॉर्मर बसला; नागरिकांचे काम मार्गी

विदर्भ केसरी । एटापल्ली

तालुक्यातील गट्टा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या गोरगुटाटा येथे जळालेल्या ट्रान्सफॉर्मरमुळे निर्माण झालेली गंभीर वीज समस्या अखेर भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या (भाकपा) प्रभावी पाठपुराव्यामुळे मार्गी लागली आहे. भाकपाकडे मदतीसाठी धाव घेतलेल्या ग्रामस्थांची मागणी पूर्ण करत अखेर नवीन ट्रान्सफॉर्मर बसवण्यात आला असून गावातील वीजपुरवठा सुरळीत झाला आहे. ग्रामस्थांनी भाकपाकडे मागितली मदत, तात्काळ दखल गेल्या अनेक दिवसांपासून वीज नसल्यामुळे त्रस्त झालेल्या गोरगुटाटा येथील नागरिकांनी भाकपाकडे मदतीची विनंती केली होती. नागरिकांची




अडचण लक्षात घेऊन भाकपाचे जिल्हा सहसचिव कॉ. सचिन मोतकुरवार यांनी तात्काळ या प्रकरणाची दखल घेत संबंधित विभागाशी सातत्याने पाठपुरावा केला. भाकपाच्या प्रयत्नांना यश भाकपाने प्रशासनावर सातत्याने दबाव आणत ट्रान्सफॉर्मर तात्काळ बदलण्याची मागणी केली होती. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश येत महावितरण विभागाने नवीन ट्रान्सफॉर्मर बसवला. त्यामुळे अनेक दिवस अंधारात असलेल्या गावात पुन्हा वीजपुरवठा सुरू झाला आहे. नागरिकांकडून समाधान व्यक्त नवीन ट्रान्सफॉर्मर बसवल्यामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांनी भाकपाचे आभार मानले आहेत. "आम्ही भाकपाकडे मदत मागितली आणि त्यांनी आमची समस्या तत्काळ सोडवली," अशी प्रतिक्रिया गावकऱ्यांनी दिली. भाकपाची ठाम भूमिका "गोरगुटाटा येथील नागरिकांना न्याय मिळवून देणे ही आमची जबाबदारी होती. भविष्यातही अशा कोणत्याही समस्या सोडवण्यासाठी भाकपा नेहमी नागरिकांच्या पाठीशी उभी राहील," असे कॉ. सचिन मोतकुरवार यांनी सांगितले.

## येरमनार येथील शेतकऱ्याची पर्यावरण पोषक उद्योजक म्हणून निवड..!

विदर्भ केसरी । पेरमिली

अती प्रभावित मेगा पाणलोट प्रकल्पाची अंमलबजावणी बायफ संस्था पुणे व BRLF दिल्ली यांच्या संयुक्त पुढाकाराने अहेरी तालुक्यातील 20 ग्रामपंचायत मध्ये सुरू झाली आहे. या प्रकल्पा मधील उपजीविका या उपक्रमांतर्गत शेतीला जोड व्यवसाय म्हणून बकरी पालन, कुकूट पालन करणाऱ्या 20 लोकांची प्रात्यक्षिक शेतकरी म्हणून निवड करण्यात आली होती व यांच्या सोबत एक वर्षा पासून काम सुरू आहे या मधून एक शेतकरी पोच्या पेंटा तलांडी येरमनार यांची पर्यावरण पोषक उद्योजक म्हणून निवड करून त्यांना 2 बेरारी बोकड, शेड व भाजीपाला रोपटे रोपवाटिका साठी साहित्य सहाय्य करण्यात आले आहे. यांनी बोकडाचे संगोपन व्यवस्थापन



करावे व दुसऱ्या शेतकऱ्यां कडील बकरी पालन धारक यांना सेवा देऊन आपला व्यवसाय करावा. तसेच भाजीपाला रोपटे रोपवाटिका तयार करून चांगल्या जातीची रोपे भाजीपाला लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना उपलब्ध विक्री करून व्यवसाय सुरू करण्यात आला आहे. यासाठी मदत, मार्गदर्शन बायफ संस्था अहेरी चे मंगेश कुडे प्रकल्प अधिकारी, अतुल डोर्लीकर उपजीविका अधिकारी, प्रेरक लालसु तलांडी यांचे कडून वेळोवेळी करण्यात येत आहे.

## नवनिर्मित पोमकें बंगाडी येथे आरोग्य शिबिराचे आयोजन..!

### गावांतील एकूण 80 नागरिकांची तज्ज्ञ वैद्यकीय पथकाकडून तपासणी..!

विदर्भ केसरी । गडचिरोली

पोलीस रुग्णालय गडचिरोली, जिल्हा सामान्य रुग्णालय गडचिरोली, जिल्हा परिषद गडचिरोली व सीआरपीएफ यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या उपक्रमात आरोग्य शिबिरादरम्यान फिरत्या प्रदर्शनीच्या माध्यमातून शहीद जवानांचे बलिदान व पोलीस दलाच्या कार्याबद्दल जनजागृती करण्यात आली. सदर जनजागृती अंतर्गत गडचिरोली पोलीस दलाकडून जिल्ह्यातील नागरिकांसाठी वेळोवेळी विविध कल्याणकारी उपक्रम राबविले जात असतात. जिल्हामधील अतिदुर्गम भागातील नागरिकांपर्यंत देखील आरोग्य सेवा पोहचविण्याच्या उद्देशाने गडचिरोली पोलीस दलाकडून विविध आरोग्य मेळावे आयोजित केले जात असतात. याच उपक्रमांचा एक भाग म्हणून गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने दिनांक 19 मार्च 2026 रोजी उपविभाग भामरागड अंतर्गत उभारण्यात आलेल्या नवनिर्मित पोमके बंगाडी येथे आज दिनांक 11 एप्रिल 2026 रोजी पोलीस रुग्णालय गडचिरोली, जिल्हा सामान्य रुग्णालय गडचिरोली, जिल्हा परिषद गडचिरोली व सीआरपीएफ यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत



आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अतिदुर्गम भागातील नागरिकांमध्ये आरोग्य सुविधांविषयी जनजागृती करुन नागरिकांना विविध आरोग्य तपासणी आणि औषधोपचार मिळवून देण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक गडचिरोली श्री. नीलोत्पल यांच्या मार्गदर्शनाखाली सदर आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय गडचिरोलीचे डॉ. धनंजय खंडागळे (फिजीशियन), महिला व बाल रुग्णालय गडचिरोली डॉ. मुकेश अत्यालगडे (बालरोग तज्ज्ञ), ग्रामीण रुग्णालय चामोर्शीचे वैद्यकिय अधीक्षक डॉ. प्रविण किलनाके (स्त्रीरोग तज्ञ), पोलीस रुग्णालय गडचिरोलीच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रोशनी किरंगे तसेच 09 बटा. सीआरपीएफचे वैद्यकीय अधिकारी डॉ. डी. एस. मोहन यांचे नेतृत्वात नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. सदर मेळाव्यादरम्यान हद्दीतील सुमारे 80 नागरिकांची विविध आजारांबाबत तपासणी करून आवश्यकतेनूसार नागरिकांना मोफत औषधे उपलब्ध करुन देण्यात आली तसेच विविध आजारांविषयी व पोषण समस्यांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी एकूण 10 नागरिकांना आवश्यकतेनूसार विविध रुग्णालयांच्या ठिकाणी पुढील तपासणीसाठी शिफारस केलेली आहे. तसेच बालरोग तज्ञांकडून शालेय विद्यार्थ्यांची तपासणी आणि स्त्रीरोग तज्ञांकडून गरोदर माता व इतर महिलांची तपासणी करण्यात येऊन आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले आहे. तसेच एकूण 05 रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून एकूण 4,361 युनिट रक्ताचे संकलन करण्यात आले आहे. यासोबतच ऑपरेशन रोशनीच्या माध्यमातून एकूण 9,971 पेक्षा अधिक नागरिकांची नेत्र तपासणी करुन एकूण 1,412 नागरिकांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आलेली आहे. यासोबतच गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने गडचिरोली जिल्हात कार्यरत असतांना शहीद जवानांनी दिलेल्या बलिदानाबद्दल, सी-60 जवानांच्या शौर्याबद्दल व नागरी कृती उपक्रमांबद्दल उपस्थित नागरिकांना विविध बॅनरच्या माध्यमातून माहिती देण्यात येऊन जनजागृती करण्यात आली.

सदर शिबिराचे आयोजन पोलीस अधीक्षक गडचिरोली मा. नीलोत्पल, मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. गडचिरोली मा. सुहास गाडे, कमांडंट सीआरपीएफ 09 बटा. शंभु कुमार, प्रभारी पोलीस अधीक्षक तथा अपर पोलीस अधीक्षक (अभियान) एम. रमेश, अपर पोलीस अधीक्षक अहेरी कार्तिक मधीरा, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी., पोलीस उप-अधीक्षक (अभियान) विशाल नागरगोजे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी भामरागड अमर मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली नवनिर्मित पोमकें बिनागुंडाचे प्रभारी अधिकारी पोउपनि. विजय आगलावे, पोउपनि. शुभम लांडगे, सिआरपीएफ 192 बटालीयनचे उप-कमांडट महेश मिना, एसआरपीएफचे रा.पो. उप नि. यादव तांबोळी व अंमलदार यांनी यशस्वीरित्या पार पाडले.

## नगराध्यक्ष ॲड. प्रणोती निंबोरकर यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन!

### समता, बंधुता आणि शिक्षणाच्या विचारांना उजाळा...!

विदर्भ केसरी । गडचिरोली

समता, बंधुता आणि शिक्षणाचे अग्रदूत तसेच समाजक्रांतीचे महान पुरस्कर्ते क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त गडचिरोली नगर परिषद येथे आदरांजलीचा भावपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी नगराध्यक्ष ॲड. प्रणोती सागर निंबोरकर यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांच्या विचारांची आजच्या समाजात अधिक गरज असल्याचे प्रतिपादन केले. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील वंचित, शोषित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे महान कार्य महात्मा फुले यांनी केले.


त्यांच्या समतेच्या आणि बंधुत्वाच्या विचारांनी भारतीय




समाजाला नवी दिशा दिली आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील वंचित, शोषित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे महान कार्य महात्मा फुले यांनी केले. यावेळी नगरसेवक, सभापती तसेच नगर परिषद कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत प्रेरणादायी आणि भावपूर्ण झाले होते.

महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे त्यांच्या कार्याची आणि विचारांची नव्याने आठवण होत असून, समाजात समता, बंधुता आणि शिक्षणाचा संदेश अधिक दृढ करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

> “महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार आजही तितकेच प्रेरणादायी आहेत. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शिक्षण पोहोचवणे आणि समानतेची भावना रुजवणे हे आपले कर्तव्य आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपण समाजहितासाठी अधिक जोमाने कार्य करणे आवश्यक आहे"
>
> - ॲड. प्रणोती सागर निंबोरकर नगराध्यक्ष न.प.गडचीरोली



# श्री गॅस एजन्सीत वितरणाचा गोंधळ उघड..!

## बुकिंग व ओटीपी मिळूनही 42 दिवसांनंतरही सिलेंडर नाही

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे






गडचिरोली :- शहरातील आठवडी बाजार परिसरात असलेल्या श्री गॅस एजन्सी (एचपी गॅस वितरक) कडून गॅस वितरणात मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याचा आरोप ग्राहकांनी केला आहे. पूर्वीचा सिलेंडर घेतल्यानंतर 25 दिवसांनी पुन्हा बुकिंग करण्याची अट पूर्ण करूनही, तसेच बुकिंगनंतर ओटीपी मिळाल्यानंतरही तब्बल 17 दिवस उलटून गेल्यानंतरही अनेक ग्राहकांना सिलेंडर घरपोच मिळाला नाही. त्यामुळे एकूण 42 दिवसांचा कालावधी उलटूनही ग्राहकांना सिलेंडर उपलब्ध झाला नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून सुभाष वॉर्ड परिसरातील अनेक ग्राहकांनी 24 आणि 27 मार्च रोजी बुकिंग करून ओटीपी मिळाल्याचे सांगितले. मात्र, ओटीपी मिळूनही 17 दिवस उलटून गेले तरी सिलेंडर न मिळाल्याने ग्राहकांनी एजन्सीकडे चौकशी केली. त्यावेळी एजन्सीच्या संचालकाच्या मुलाने समाधानकारक उत्तर न दिल्याने नागरिकांनी संताप व्यक्त करत जिल्हा पुरवठा विभागाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीची दखल घेत जिल्हा पुरवठा विभागाने निरीक्षण अधिकारी वैशाली आंबेकर यांना चौकशीसाठी एजन्सीवर पाठवले. चौकशीदरम्यान 5 आणि 6 एप्रिल रोजीच्या बुकिंगवर सिलेंडर वितरण झालेले आढळले, परंतु 20 आणि 27 मार्चच्या बुकिंग असलेल्या ग्राहकांना अद्याप सिलेंडर मिळालेला नाही, हे स्पष्ट झाले. निरीक्षण अधिकाऱ्यांनी ग्राहकांचे निवेदन नोंदवून त्याचा अहवाल जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येईल व संबंधित एजन्सीवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले. प्रशासनाकडून जिल्ह्यात गॅसचा कोणताही तुटवडा नसल्याचे वारंवार सांगितले जात असले तरी, प्रत्यक्षात एजन्सीकडे दररोज सिलेंडरचा पुरवठा होत असतांनाही ग्राहकांना 25 ते 55 दिवस प्रतीक्षा करावी लागत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. त्यामुळे गॅस वितरण व्यवस्थेतील त्रुटींवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

दरम्यान, शहरातील भारत गॅस वितरक राजकुमार गॅस एजन्सी काही दिवसांपूर्वी बंद झाल्यानंतर त्यांचे सर्व ग्राहक दुसऱ्या एजन्सीकडे जोडण्यात आले. मात्र, त्या ग्राहकांना ग्रामीण भागातील ग्राहक म्हणून दाखवून जवळपास 55 दिवसांपर्यंत सिलेंडर न दिल्याची तक्रारही पुढे आली आहे. ग्राहकांनी पुरवठा विभागाला स्पष्ट इशारा दिला आहे की, तात्काळ सिलेंडर वितरण सुरळीत केले नाही, तर संबंधित एजन्सीविरोधात पोलीस तक्रार करून गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जाईल.

» Selected

## पिसेवडधा येथे आयोजित महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात पार पडले




देसाईगंज - छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिरामध्ये नागरिकांच्या प्रलंबित समस्यांचे तात्काळ निवारण व्हावे आणि शासकीय योजना थेट जनतेपर्यंत पोहोचाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे मत आमदार रामदास मसराम यांनी सांगितले. या कार्यक्रमाला तहसीलदार उषा चौधरी, नायब तहसीलदार हरीदास दोनाडकर, प्रशासक प्रदीप कुमरे, तालुका काँग्रेस अध्यक्ष मिलिंद खोब्रागडे, सामाजिक कार्यकर्ते दिलीप घोडाम, प्रशासक मयुरी पेन्दाम, पोलिस पाटील तुकाराम वैद्य, मुन्नासिंह चंदेल, स्वप्निल ताडाम, कृषी विस्तार अधिकारी मोगरकर, कृषी मंडळ अधिकारी संदीप नाकाडे, मंडळ अधिकारी कुमरे, मंडळ अधिकारी किरगे, शामराव आलाम.व इतर पदाधिकारी उपस्थित होते. पिसेवडधा मंडळ परिसरातील नागरिकांनी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## नितीश कुमार अखेर 'या' दिवशी देणार राजीनामा

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून बिहारच्या राजकारणात मोठ्या घडामोडी सुरू आहेत. नितीश कुमार यांनी राज्यसभेच्या खासदारकीची शपथ घेतली आहे. मात्र, नितीश कुमार राज्यसभेचे सदस्य झाले असले तरी अद्याप त्यांनी बिहारच्या मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिलेला नाही. पण आता नितीश कुमार यांच्या राजीनाम्याची तारीख जवळपास निश्चित झाल्याची माहिती समोर आली असून १४ एप्रिलनंतर बिहारला नवे मुख्यमंत्री मिळण्याची शक्यता आहे. नितीश कुमार यांनी राजीनामा दिल्यानंतर बिहारच्या मुख्यमंत्रीपदी कोणाची वर्णी लागणार? याकडे सर्वांचंच लक्ष लागलं आहे. नितीश कुमार यांनी राजीनामा दिल्यानंतर भाजपासाठी मार्ग मोकळा होणार आहे. या घडामोडींबाबत कोणत्याही वरिष्ठ नेत्याने अधिकृतपणे भाष्य केलेलं नाही. मात्र, राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. नितीश कुमार यांचं पाटणाच्या राजकीय पटलावरून निवृत्त होणं हा एक मोठा ऐतिहासिक बदल मानला जात आहे. त्यामुळे बिहारच्या राजकारणातील ही मोठी घडामोड मानली जात असून मागील काही दिवसांपासून सत्तांतराच्या हालचालींना वेग आल्याचं पाहायला मिळत आहे.

# धान खरेदीचे उद्दिष्ट तात्काळ वाढवा, भाकप चे जिल्हाधिकारी यांना निवेदन!

विदर्भ केसरी । प्रल्हाद मेश्राम




देसाईगंज : ब्रह्मपुरी तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांच्या धानाची विक्री होऊनही केवळ 'उद्दिष्ट' संपल्याच्या तांत्रिक कारणामुळे चुकारे रखडले आहेत. हा अन्नदात्याचा छळ असून, येत्या आठवडाभरात धान खरेदीची मर्यादा वाढवून न दिल्यास भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा लढाऊ शेतकरी नेते कॉ. विनोद झोडगे यांनी दिला आहे. गुरुवार, ९ एप्रिल २०२६ रोजी ब्रम्हपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांसह जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देऊन जिल्हाधिकारी मा. वसुमना पंत यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले. खरेदी होऊनही 'बिलिंग' ठप्प: तालुक्यातील मुडझा, आवळगाव, हळदा, वांद्रा, बरडकिन्ही आणि गांगलवाडी परिसरातील सेवा सहकारी संस्थांच्या केंद्रांवर शेतकऱ्यांनी धान विक्री केली आहे. मात्र, शासनाचे उद्दिष्ट संपल्यामुळे गेल्या ३-४ महिन्यांपासून या धानाची ऑनलाईन 'बिलिंग' झालेली नाही. कर्जाचा डोंगर आणि बँकांचा तगादा: धानाचे चुकारे वेळेवर मिळतील या आशेवर शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेतले होते. मात्र, पैसे न मिळाल्याने कर्जाची परतफेड रखडली असून शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. प्रशासनाशी थेट चर्चा:

कॉ. विनोद झोडगे यांनी निवेदन सादर करतानाच जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा केली आणि तालुक्यातील विदारक स्थिती मांडून तातडीने मर्यादा वाढवण्याची मागणी केली, तेव्हा लवकरच कलेक्टर ऑफिसला बैठक घेऊन तोडगा काढण्याचे आश्वासन दिले आहे. शेतकरी नेत्यांचा आक्रमक पवित्रा: जर ७ दिवसांच्या आत शासनाने सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर भाकपच्या वतीने शेतकरी रस्त्यावर उतरून आपल्या हक्काचा लढा लढतील, असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉ रवींद्र उमाटे,सहसचिव कॉ.राजू गयनेवार ,किसान सभा जिल्हा अध्यक्ष कॉ.प्रा.नामदेव कनाके, शशिकांत वार्जुकर,महेश दूमाने, खेमराज उरकूडे,संकेत चौधरी यांच्यासह तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.

# गडचिरोलीतील कुस्तीपटूंना ३८ वी विदर्भ केसरीसाठी निवड

विदर्भ केसरी । गडचिरोली



३८ वी विदर्भ केसरी कुस्ती स्पर्धेत भाग घेण्यासाठी गडचिरोली जिल्ह्यातील कुस्तीपटूंना निवड चाचणीमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ही स्पर्धा विदर्भ कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने अचलपूर, जिल्हा अमरावती येथे १५ एप्रिल २०२६ ते १७ एप्रिल २०२६ दरम्यान होणार आहे. निवड चाचणी १२ एप्रिल २०२६ रोजी, रविवार दुपारी १२.०० वाजता जिल्हा क्रीडा संकुल कॉम्प्लेक्स, गडचिरोली येथे आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धा व वजन गटाचे तपशील - पुरुष कुमार मुले (१७ वर्षांखालील): ४८, ५१, ५५ किलो, जन्म तारीख ०१/०१/२००९ नंतरची असावी. महिला कुमारी मुली (१७ वर्षांखालील): ४०, ४३, ४६ किलो; जन्म तारीख ०१/०१/२००९ नंतरची असावी. पुरुष विदर्भ केसरी गटः वजन ७५ ते १२५ किलो; वय १८ वर्षांपेक्षा जास्त असणे आवश्यक. महिला गटः ४८, ५३, ५७, ५९, ६७ ते ७६ किलो; वय १८ वर्षांपेक्षा जास्त असावे. पुरुष इतर गटः ५७, ६१, ६५, ७०, ७४, ७५ ते १२५ किलो, गडचिरोली जिल्हा तालीम कुस्तीगीर संघाचे जिल्हा अध्यक्ष प्रमोद पिपरे यांनी सर्व कुस्तीपटूंना जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# जिद्द आणि प्रशिक्षणाची जोड; अहेरीतील दुर्गम भागातील तरुणांची सरकारी नोकरीकडे झेप

## सुरजागड इस्पात आणि मियाम चॅरिटेबल ट्रस्टचा उपक्रम...!

विदर्भ केसरी । अहेरी




गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागातील तरुणाई आता केवळ स्वप्न पाहत नसून ती सत्यात उतरवत आहे. अहेरी उपविभागातील अत्यंत सामान्य परिस्थिती असलेल्या तीन विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सरकारी नोकरीला गवसणी घातली आहे. सुरजागड इस्पात प्रायव्हेट लिमिटेड आणि 'मियाम' चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून चालवल्या जाणाऱ्या अकादमीतील प्रशिक्षणाने या तरुणांच्या यशाला खऱ्या अर्थाने दिशा दिली आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये चिंतलपेठ येथील दिपाली भाऊराव चुनारकर, अकारपल्ली येथील वंदना भीमराव आत्राम आणि खमणचेरू येथील तिरुपती विकास मडावी यांचा समावेश आहे. या यशाने दुर्गम भागातील पालकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी आणि सामाजिक संस्थांच्या समन्वयातून परिवर्तनाची नवी लाट निर्माण होत असल्याचे चित्र आहे. संघर्षातून यशाचा मार्ग: दिपाली चुनारकर हिची निवड कर्मचारी निवड आयोगाच्या माध्यमातून निमलष्करी दलात झाली आहे. दिपालीचे आई-वडील गावपातळीवर छोटेसे किराणा दुकान चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. आर्थिक ओढाताण असूनही तिने प्रशिक्षणात सातत्य ठेवले. दुसरीकडे, वंदना आत्राम आणि तिरुपती मडावी यांची गडचिरोली पोलीस दलात निवड झाली आहे. वंदनाचे आई-वडील शेतमजूर असून त्यांनी मोलमजुरी करून लेकीच्या शिक्षणासाठी तिला गावाबाहेर पाठवले. तर तिरुपती हा पदवीधर असूनही अनेक वर्षांपासून रोजगाराच्या शोधात होता. मियाम अकादमीच्या मार्गदर्शनामुळे त्याच्या कष्टाला फळ मिळाले आहे. 'हर घर नौकरी'चा संकल्प: सुरजागड इस्पात आणि मियाम ट्रस्टने चिंतलपेठ येथे सुरू केलेली ही मोफत अकादमी दुर्गम भागातील तरुणांसाठी आधारवड ठरत आहे. 'हर घर नौकरी, जीवनभर रोशनी' या ब्रीदवाक्यासह सुरू झालेल्या या उपक्रमांतर्गत केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे, तर शारीरिक चाचणीसाठी लागणारे मैदानी प्रशिक्षणही मोफत दिले जाते. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी लागणारी पुस्तके, स्टेशनरी, गणवेश आणि प्रवासासाठी बसची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. अष्टपैलू प्रशिक्षण आणि तज्ज्ञ मार्गदर्शक: या अकादमीत युपीएससी, एमपीएससीसह पोलीस भरती, लष्करी भरती आणि रेल्वे अशा विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेतली जाते. निवृत्त पॅरा कमांडो सुमेर सिंग यांच्या देखरेखीखाली मैदानी प्रशिक्षण दिले जाते, तर गणित आणि सामान्य ज्ञानासाठी पंकज पोटे व महेश अलोने यांसारखे तज्ज्ञ शिक्षक मार्गदर्शन करत आहेत. जिल्ह्यातील खाण प्रकल्प आणि औद्योगिक विकासामुळे स्थानिक तरुणांच्या हाताला काम मिळावे, यासाठी अशा प्रकारच्या शैक्षणिक उपक्रमांची मोठी मदत होत असल्याचे मत मियामच्या प्रमुख नितु जोशी यांनी व्यक्त केले आहे.

# अंत्योदयाच्या संकल्पनेतून आलापल्ली येथे अन्नधान्य किट वाटप

## मा.खा.डॉ. अशोकजी नेते यांच्या नेतृत्वात गरजवंतांना दिलासा

विदर्भ केसरी । आल्लापली:



भारतीय जनसंघाचे प्रणेते व विचारवंत पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेली 'अंत्योदय' ही संकल्पना म्हणजे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाच्या योजना पोहोचाव्यात, हा उदात्त विचार. गरीब, दलित, वंचित, शोषित आणि पिडीत घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा हा ध्यास आजही अनेक कार्यकर्त्यांना प्रेरणा देत आहे. याच विचारातून प्रेरित होऊन आलापल्ली येथील उपसरपंच तथा भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष विनोद आकनपलीवार यांनी दरवर्षी गरजवंत नागरिकांसाठी अन्नधान्य किट वाटपाचा उपक्रम हाती घेतला आहे. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत सातत्याने राबविला जाणारा हा उपक्रम यंदाही उत्साहात पार पडला. आज दि. ११ एप्रिल रोजी आलापल्ली येथील शासकीय विश्रामगृहात माजी खासदार तथा भाजप अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. अशोकजी नेते यांच्या नेतृत्वात अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले.

एटापल्ली व अहेरी येथे आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण वर्गासाठी आगमन झालेल्या मा.खा. डॉ. नेते यांच्या हस्ते हा सामाजिक उपक्रम पार पडला.या वेळी गरजवंत कुटुंबांना अन्नधान्य किट वितरित करण्यात आले. लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि समाधान हे या उपक्रमाचे खरे यश ठरले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचा प्रयत्न या माध्यमातून प्रत्यक्षात साकार होत असल्याचे चित्र दिसून आले. कार्यक्रमाला मच्छीमार आघाडीचे जिल्हाध्यक्ष मोहनजी मदने, युवा नेते सागर डेकाटे, सुकमल हलदार तसेच परिसरातील नागरिक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. अंत्योदयाच्या विचारांची अंमलबजावणी करत समाजसेवेची ही परंपरा पुढेही अशीच सुरू राहावी, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

# भाजपमध्ये 'इनकमिंग'ला ब्रेक? खासदारांसाठी नो-एंट्री

## तुतारी'च्या चर्चेत नवा ट्विस्ट; वाढ झाली तर एनडीएचीच – भाजप नेत्याचे संकेत

विदर्भ केसरी । मुंबई



राज्यात सुरू असलेल्या 'ऑपरेशन टायगर' आणि 'ऑपरेशन तुतारी'च्या चर्चांदरम्यान राजकीय वर्तुळात आणखी एक मोठी घडामोड समोर आली आहे. दुसऱ्या पक्षातील खासदारांना भाजपमध्ये प्रवेश दिला जाणार नाही, असा महत्त्वपूर्ण संकेत पक्षातील एका वरिष्ठ नेत्याने खासगी चर्चेत दिल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे संभाव्य पक्षांतरांच्या चर्चांना नवा कलाटणी मिळाली आहे. सध्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि शिवसेना (ठाकरे गट) यांतील काही खासदार फुटण्याच्या चर्चा जोरात आहेत. हे खासदार शिवसेना शिंदे गटात प्रवेश करतील किंवा थेट भाजपच्या संपर्कात आहेत, असेही बोलले जात होते. मात्र या सर्व पार्श्वभूमीवर भाजपकडून आलेल्या संकेतांमुळे या चर्चांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ाजपच्या एका बड्या नेत्याने खासगीत स्पष्ट केल्याचे सांगितले जात आहे की, "खासदारांची संख्या वाढली तर ती एनडीएची वाढेल, भाजपची नाही. याचा अर्थ, इतर पक्षातील खासदारांना थेट भाजपमध्ये प्रवेश देण्याऐवजी त्यांना सहयोगी पक्षांत सामावून घेण्याची रणनीती आखली जात असल्याची शक्यता व्यक्त होत आहे.

धानामुळे सध्या सुरू असलेल्या 'ऑपरेशन'च्या चर्चांना मोठा धक्का बसला आहे. कारण आतापर्यंत या संभाव्य पक्षांतरांमुळे भाजपची ताकद वाढेल, असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र आता भाजपने स्वतःसाठी 'नो-एंट्री'ची भूमिका घेतल्याचे दिसत असल्याने राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे आहेत.दरम्यान, शिवसेना ठाकरे गटातील खासदार शिंदे गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही स्पष्ट भूमिका घेतली आहे. "अशी कोणतीही घडामोड घडणार नाही," असे सांगत त्यांनी या बातम्या फेटाळून लावल्या आहेत.राज्यातील राजकारण सध्या अफवा, दावे-प्रतिदावे आणि गुप्त बैठकींच्या चर्चांमुळे तापलेले असताना, भाजपच्या या भूमिकेमुळे पुढील काळात पक्षांतरांची दिशा याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एकूणच, 'इनकमिंग'वर मर्यादा घालण्याचा भाजपचा संभाव्य निर्णय आणि सहयोगी पक्षांच्या माध्यमातून ताकद वाढवण्याची रणनीती हे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे ठरणार आहे.

# काँग्रेसच्या वतीने संघटन सृजन अभियान

विदर्भ केसरी । देसाईगंज

देसाईगंज - चिमूर येथे काँग्रेस पक्षाच्या वतीने संघटन सृजन अभियान अंतर्गत बैठक उत्साहात पार पडली. काँग्रेस पक्षाचे संघटन अधिक कार्यक्षम व बळकट करण्याच्या उद्देशाने देशभरात हे अभियान राबविण्यात येत असून, त्याच अनुषंगाने चिमूर-नागभीड विधानसभा क्षेत्राची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे लोकप्रिय खासदार डॉ. नामदेवजी किरसान यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीचे निरीक्षक संतोष कालकोडा, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे कोषाध्यक्ष अभय छाजड, चंद्रपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुभाषजी धोटे, अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रफुलभाऊ खापर्डे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी चिमूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. विजय गावंडे, नागभीड तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रमोद चौधरी, ज्येष्ठ नेते जुनेद खान, गजानन बुटके, नागेंद्र चट्टे, धनराज मुंगले, राम राऊत, राजू लोणारे, किशोर शिंगरे, पुरुषोत्तम बघमारे, रमेश घुग्गुसकर, संजय माकोडे, नरेंद्र हेमने, प्रतीक भसीन, खोजरामजी मरसकोल्हे, अमोलजी वानखडे, महेश कुजेकर, गजानन उरकुडे, संतोष जुगनाके, संजय अमृतकर, संदीप जीवतोडे, राहुल रामटेके, प्रा. डॉ. संदीप सातव, सुरज चौधरी, हरीश मुळे, राजेंद्र मेश्राम, नितेश ठाकरे, प्रमोद गायकवाड, धर्माजी देशमुख, राजू मसराम, प्रणया ताई गड्डमवार, सुनीताताई डोईजड, सोनाली ताई दांडेकर, आशाताई गायकवाड, सुनीताताई संदोकार, सुजाताई राऊत, उषाताई ठाकरे, योगिताताई मिसार, नुरी सत्यानी, अस्मिता घोडेस्वार, शमा शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी खासदार डॉ. नामदेवजी किरसान यांनी मार्गदर्शन करताना संघटन मजबूत करण्यासाठी तळागाळातील कार्यकर्त्यांनी सक्रिय राहून पक्षाची विचारधारा जनतेपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन केले. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वांनी एकजुटीने काम करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. कार्यक्रमास काँग्रेस पक्षाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.